महाराष्ट्र राज्य

उच्च व तंत्र शिक्षण विभाग

व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र

यांच्या संयुक्त विद्यमाने

# करिअर कट्टा

## युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी

## महाविद्यालयासाठी माहिती पुस्तिका

२०२५ - २६



# - अनुक्रमणिका -



| अ. क्र. | तपशील | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ०१ | संकल्पना | ०१ |
| ०२ | सल्लागार मंडळ | ०३ |
| ०३ | विभागीय प्राचार्य प्रवर्तक आणि विभागीय समन्वयक | ०४ |
| ०४ | प्राचार्य प्रवर्तक | ०५ |
| ०५ | सेवानिवृत्ती नंतर विशेष सहभाग असणारे मान्यवर व सहविभागीय समन्वयक | ०७ |
| ०६ | जिल्हा समन्वयक | ०८ |
| ०७ | संपादकीय | ११ |
| ०८ | करिअर कट्टाचे विद्यार्थ्यांसाठीचे उपक्रम | १२ |
| ०९ | गर्जे मराठी ग्लोबल आणि करिअर कट्टा | १४ |
| १० | मधुर क्रांती | १५ |
| ११ | करिअर कट्टा मासिक | १६ |
| १२ | करिअर डायरी आणि स्वयं मूल्यमापन | १८ |
| १३ | विद्यार्थ्यांसाठी माहिती पत्रक | २१ |
| १४ | कौशल्य प्रशिक्षण उपक्रम | २२ |
| १५ | फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम (FDP) | २३ |
| १६ | आवाजाची कार्यशाळा | २५ |
| १७ | ॲड ऑन कोर्स वेळापत्रक | २६ |
| १८ | करिअर संसद | २७ |
| १९ | करिअर संसदेचे अधिवेशन | २८ |
| २० | मॉडेल कौशल्य विकास केंद्र | २९ |
| २१ | सेंटर ऑफ एक्सलन्स | ३० |
| २२ | आर्थिक साक्षरता कार्यशाळा | ३५ |
| २३ | अक्षय्या नारी शक्ती संघ | ३६ |
| २४ | इतर उपक्रम | ३८ |
| २५ | करिअर कट्टा पदाधिकारी कार्यपध्दती | ३९ |
| २६ | समन्वयक बैठकीचे नियोजन | ४२ |
| २७ | दैनंदिन उपक्रम | ४३ |
| २८ | महाविद्यालयीन स्पर्धा | ४४ |
| २९ | आवश्यक पत्रांचे नमुने | ४५ |
| ३० | राज्यस्तरीय समिती | ४८ |
| ३१ | स्टेट रिसोर्स सेंटर | ५८ |
| ३२ | करिअर कट्टा फलकाचा नमुना व कार्यकृती आराखडा | ६३ |

# - उच्च शिक्षण विभागाचे परिपत्रक -



डॉ. शैलेंद्र देवळाणकर
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य

**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण).**
**महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.**


Web : www.dhepune .gov. in E-Mail :mavi. dhepune@gov.in

फोन नं.020/26122119,26051512,26130627,26124639 फॅक्स नं. 020/26111153.


क्र.: उशिसं/मवि-१/ करिअर कट्टा /२०२३/ ६६३९ दिनांक: .६.२०२३

- 7 JUN 2023

## परिपत्रक

**विषय: राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांशी संलग्नित महाविद्यालयांच्या माहिती पुस्तिकेमध्ये करिअर कट्टा विषयक माहिती देणे व नोंदणी अभियान राबविणेबाबत..**

वाचा- १. शासनपत्र क्र.: संकीर्ण २३२३/प्र.क्र.११५/मशि-२ दि. ६ जून २०२३
२. अध्यक्ष, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र- कोल्हापूर यांचे पत्र क्र.: MITSC/OUT/FEBRUARY 2023/M/1313 दि. ९.२.२०२३

उपरोक्त वाचा क्र. २ ची प्रत व सहपत्रे सोबत जोडली आहेत, कृपया अवलोकनी घ्यावीत.

अध्यक्ष महाराष्ट्र राज्य तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र प्रस्तावीत केल्यानुसार, करिअर कट्टा उपक्रमाची माहिती राज्यातील सर्व महाविद्यालयांच्या माहिती पुस्तिकेमध्ये देणे व महाविद्यालयांमध्ये विद्यार्थी नोंदणी अभियान राबविणे या बाबी परिपत्रकान्वये सर्व महाविद्यालयांस व विद्यापीठांस कळविणेबाबत संचालनालयास निर्देश प्राप्त झाले आहेत.

वाचा क्र. १ मधील सुचनांच्या अनुषंगाने चालू शैक्षणिक वर्षात महाविद्यालयांच्या माहिती पुस्तिकेमध्ये "करिअर कट्टा उपक्रमाची माहिती समाविष्ठ करण्याबाबत व विद्यार्थी नोंदणी अभियान राबविणेबाबत" सर्व संलग्नित महाविद्यालयांना, आपल्या स्तरावरुन सूचना देण्यात याव्यात.

महाविद्यालयांनी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संबंधित विद्यापीठांनी संकलीत करुन एकत्रित स्वरुपात विभागीय सहसंचालक कार्यालय, उच्च शिक्षण यांना व विभागीय सहसंचालक कार्यालयांनी सदर अहवाल संचालनालयास सादर करावा. (महाविद्यालयांनी कार्यवाहीचा अहवाल परस्पर संचालनालयास अथवा शासनास ई-मेल द्वारे सादर करु नये.)

(डॉ. शैलेंद्र देवळाणकर)
शिक्षण संचालक(उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे -१.

प्रति,
१. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.
२. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे/अभिमत विद्यापीठे/स्वयंअर्थसहायित विद्यापीठे - महाराष्ट्र राज्य.

प्रत माहितीस्तव- १. मा. हे.सु.पाठक - अवर सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. अध्यक्ष, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र-महिला बँक बेसमेंट, खासबाग मैदान, कोल्हापूर- ४१६०१२.

# - तंत्र शिक्षण विभागाचे परिपत्रक -



**डॉ. विनोद मोहितकर**
**शिक्षण संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य**

महाराष्ट्र शासन

**तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य**

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४६५/४५०/४७७
ई-मेल – desk2a@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: https://dte.maharashtra.gov.in

दिनांक : 1 2 JUN 2023.

क्रमांक: २अ/एडीएम/ २०२३/ १७२

1 2 JUN 2023

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई,पुणे,नाशिक,औरंगाबाद,अमरावती,नागपूर

विषय : **तंत्रशिक्षण संचालनालयाशी संबंधित तांत्रिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांच्या माहितीपुस्तिकेमध्ये " करिअर कट्टा " विषयक माहिती देणे व नोंदणी अभियान राबविण्याबाबत....**

संदर्भ : १) शासन पत्र उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण २३२३/ प्र.क्र.११५/ मशि-२, दिनांक ६.६.२०२३

२) अध्यक्ष,महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र,कोल्हापूर यांचे पत्र क्रमांक MITSC/OUT/FEBRUARY २०२३/M/१३१३, दिनांक ९.२.२०२३

शासनाच्या उच्च शिक्षण विभागाने महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र,कोल्हापूर यांनी प्रस्तावित केल्यानुसार **" करिअर कट्टा "** उपक्रमाची माहिती उच्च शिक्षणाशी संबंधित संस्थांच्या माहितीपुस्तिकेमध्ये देणे व या संस्थांमध्ये विद्यार्थी नोंदणी अभियान राबविणेबाबत निर्देश संदर्भाधीन शासन पत्रानुसार दिलेले आहेत. दिनांक ८.६.२०२३ रोजी मा.मंत्रीमहोदयांनी घेतलेल्या आढावा बैठकीत सदर निर्देशाप्रमाणे तंत्रशिक्षणाशी संबंधित संस्थांच्या माहितीपुस्तिकांमध्येही करिअर कट्टा उपक्रमाची माहिती आणि विद्यार्थ्यांचे नोंदणी अभियान राबविण्याच्या सूचना देण्यात आल्या.

त्या अनुषंगाने कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिनस्त असलेल्या तांत्रिक व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांकडून प्रसिध्द करण्यात येणा-या माहिती पुस्तिकेमध्ये " करिअर कट्टा " विषयक उपक्रमाची माहिती समाविष्ट करण्याबाबत आणि विद्यार्थी नोंदणी अभियान राबविणेबाबत आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व संस्थांना कळविण्यात यावे. अधिक माहितीसाठी संदर्भाधीन पत्रांची प्रत सोबत जोडली आहे.

सदर प्रकरणी आपल्या अधिनस्त संस्थांनी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल प्रत्येक विभागाने संकलित करुन विभागनिहाय एकत्रित अहवाल संचालनालयास सादर करावा. संस्थांना थेट संचालनालयास अथवा शासनास अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात येऊ नये या बाबीची विशेषत्वाने नोंद घ्यावी.

(डॉ.विनोद मोहितकर)
प्र.संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत माहितीसाठी :-
१.मा.प्रधान सचिव,उच्च व तंत्रशिक्षण विभाग,मंत्रालय विस्तार भवन,मुंबई
२. अध्यक्ष,महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र कोल्हापूर (ई मेल द्वारे uvajagar@gmail.com)

# संकल्पना



महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असणारा 'करिअर कट्टा' हा उपक्रम. या उपक्रमांतर्गत राज्यातील महाविद्यालयामध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला अनुसरून राबवल्या जाणाऱ्या सर्व उपक्रमांची माहिती सर्व स्टेक होल्डरपर्यंत पोहोचावी या उद्देशाने या माहिती पुस्तिकेची निर्मिती केलेली आहे.

राज्यामध्ये १०० सेंटर ऑफ एक्सलन्स प्रस्तावित असताना पैकी ६० सेंटर्स कार्यान्वित झाले असून उर्वरित ४० सेंटर्स शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ मध्ये कार्यान्वित होतील. १०० पैकी ५० पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र अत्यंत चांगल्या पद्धतीने कार्यान्वित झालेली आहेत. करिअर कट्टाअंतर्गत १० स्टेट रिसोर्स सेंटरच्या माध्यमातून तज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन राज्यातील विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीनुसार क्षेत्रनिहाय देण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे. मॉडेल स्किल डेव्हलपमेंटच्या माध्यमातून केंद्र शासनाच्या विविध योजना विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविल्या आहेत. ॲग्रीकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्ट, बारामती यांच्या सहकार्याने राज्यातील प्रत्येक तालुक्यातील विद्यार्थ्यांमधून कृषी क्षेत्रामधील उद्योग किंवा व्यवसायामध्ये आवड असणाऱ्या तरुणांना विशेष प्रशिक्षण देऊन १५०० हून अधिक उद्योजक या माध्यमातून निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

राज्यामध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांतर्गत मधुमक्षिका पालनाच्या विषयाला जे महत्त्व विद्यापीठ स्तरावर देण्यात आलेले आहे आणि दोन क्रेडिटचे कोर्स अनेक विद्यापीठांनी तयार केलेले आहेत या कोर्सला पूरक प्रात्यक्षिक प्रशिक्षण देण्यासाठी आवश्यक असणारी यंत्रणा 'मधुर क्रांती' या उपक्रमांतर्गत केली जाणार आहे. राज्यामध्ये शंभरहून अधिक महाविद्यालयांमध्ये शास्त्रशुद्ध पद्धतीचे चार चाकी वाहन प्रशिक्षण देण्याची यंत्रणा उभी केली जात आहे. तसेच महाविद्यालयीन तरुण-तरुणींना छोट्या व्यवसायासाठी संधी मिळावी या उद्देशाने 'बिजनेस व्हॅन' देखील उपलब्ध करून दिल्या जात आहेत.

'गर्जे मराठी ग्लोबल' सारख्या आंतरराष्ट्रीय संस्थेच्या माध्यमातून १०० हून अधिक देशातील १५००० पेक्षा जास्त मराठी उद्योजकांचा आणि विद्यार्थ्यांचा समन्वय संवाद सातत्यपूर्णरित्या घडवून आणला जात आहे. या माध्यमातून आंतरराष्ट्रीय पातळीवर असणाऱ्या व्यवसायाच्या आणि नोकरीच्या संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिल्या जातील. यासाठी आवश्यक असणारे स्टार्टअप साठीचे तज्ञ मार्गदर्शक देखील करिअर कट्टाच्या व्यासपीठावर विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध आहेत. करिअर संसदेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या नेतृत्व विकासाला चालना देत असतानाच त्यांच्यामधील क्षमतांचा योग्य विकास व्हावा आणि त्यांना योग्य वेळात योग्य त्या संधी उपलब्ध व्हाव्यात या दृष्टिकोनातून विशेष प्रयत्न केले जात आहेत.

यासाठी संपूर्ण राज्यामध्ये जिल्हास्तरीय करिअर संसद नियोजन समितीची स्थापना करण्यात आलेली आहे. प्रत्येक महाविद्यालयामध्ये दोन समन्वयक करिअर कट्टा उपक्रमासाठी नियुक्त करण्यात आलेले आहेत. त्याचबरोबर प्रत्येक जिल्ह्यासाठी जिल्हा समन्वयक व प्राचार्य प्रवर्तक हे देखील हा उपक्रम जास्तीत जास्त सक्षमपणे राबवण्यासाठी कार्यरत आहेत.

# संकल्पना

पुढील पाच वर्षांमध्ये १२ लाख पेक्षा जास्त विद्यार्थ्यांच्या जीवनावर सकारात्मक परिणाम साधनाच्या उद्देशाने एक कृती आराखडा घेऊन करिअर कट्टा उपक्रम मार्गक्रमण करत आहे. यामध्ये राज्यस्तरीय सल्लागार मंडळाची भूमिका ही अत्यंत महत्त्वाची आहे. सल्लागार मंडळाने दिलेले मार्गदर्शन आणि प्राचार्य प्रवर्तक, जिल्हा समन्वयक, महाविद्यालयीन समन्वयक व करिअर संसद जिल्हा नियोजन समिती यांची कृती या अनोख्या समन्वयातून युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी करिअर कट्टा हा उपक्रम कार्यरत आहे. राज्यस्तरीय संपादकीय मंडळांनी ही माहिती पुस्तिका अत्यंत चांगली तयार व्हावी यासाठी मेहनत घेतलेली आहे. या सर्वांचे मी मनःपूर्वक आभार मानतो!

हे सर्व उपक्रम राबिण्यासाठी राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री, प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण संचालक व सहसंचालक यांनी देखील खंबीर असे पाठबळ दिलेले आहे त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार!

जय हिंद, जय महाराष्ट्र !

मा. यशवंत शितोळे
अध्यक्ष, महाराष्ट्र माहिती
तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र

# - सल्लागार मंडळ -



**मा.डॉ. शेखर गायकवाड**
मा.साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य



**मा.डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी**
उपमहासंचालक, यशदा पुणे



**मा. नामदेव भोसले**
सहसचिव, कौशल्य व उद्योजकता विकास विभाग, महाराष्ट्र राज्य



**मा. हणमंत गायकवाड**
अध्यक्ष, बी.व्ही.जी. ग्रुप



**मा. संजय इंगळे**
सहसचिव, महसूल व वनविभाग, महाराष्ट्र राज्य



**मा. श्री. उत्तम गायकवाड**
General Manager (HR & Admin)
EdCIL (India) Ltd.
(A Mini Ratna Category -
I CPSE Ministry of Education, GOI)



**मा. श्री. समीर भाटकर**
स. संचालक, (वित्त), महाराष्ट्र शासन



**मा. डॉ. तुषाबा शिंदे**
IRPS
(इंडियन रेल्वे पर्सोनल सर्व्हिस)



**मा.डॉ. प्रफुल्ल पाठक**
मा. सेक्रेटरी, सोलर सोसा. ऑफ इंडिया



**मा. श्री. आनंद गानू**
अध्यक्ष, गर्जे मराठी ग्लोबल, अमेरिका



**मा. शंकर जाधव**
सिनीअर पार्टनर, सिंघानिया ग्रुप



**मा. किशोर गोरे**
संचालक, ग्लोबल नगरी (USA)



**मा. बिपीन जगताप**
संचालक, खादी व ग्रामोद्योग, महाराष्ट्र राज्य



**मा. श्री. सचिन इटकर**
क्षेत्रीय संचालक, महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळ



**मा.डॉ. सोनाली लोहार**
ऑडिओलॉजीस्ट - व्हॉईस थेरपिस्ट



**मा.ॲड. रविंद्र पाटील**
अध्यक्ष, बार असो.व कौन्सिल, इस्लामपूर



**मा.डॉ. सचिन नांद्रे**
संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, कवियत्री बहिणाबाई चौधरी, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ



**मा. श्री. पराग मते**
संस्थापक, वुई फाऊंडेशन

# - विभागीय प्राचार्य प्रवर्तक -

पुणे



प्राचार्य
डॉ. नितिन घोरपडे

मुंबई



प्राचार्य
डॉ. अतुल साळुंखे

छ. संभाजीनगर



प्राचार्य
डॉ.भारत दत्तराव खंदारे

नांदेड



प्राचार्य
डॉ. पंजाब चव्हाण

अमरावती



प्राचार्य
डॉ.धनंजय तळवणकर

नागपूर



प्राचार्य
डॉ. शरयू तायवाडे

गडचिरोली



प्राचार्य
डॉ. ज्ञानेश्वर म्हशाखेत्री

जळगाव



प्राचार्य
डॉ. स. ना. भारंबे

कोल्हापूर



प्राचार्य
डॉ. एस. बी. पाटील

# - विभागीय समन्वयक -

पुणे



प्रा. डॉ. प्रभाकर घोडके

मुंबई



उप-प्राचार्या डॉ. दिपा वर्मा

छ. संभाजीनगर



प्रा. डॉ. राजेश लहाने

नांदेड



डॉ. सतीश चव्हाण

अमरावती



प्रा. डॉ. दिनेश खेडकर

नागपूर



मा. डॉ. नरेंद्र रघटाटे

गडचिरोली



मा. डॉ. प्रकाश बोरकर

जळगाव



प्रा. डॉ.जयेंद्र लेकुरवाळे

पश्चिम महाराष्ट्र



प्रा. डॉ. धनाजी इंगवले

# - प्राचार्य प्रवर्तक -

पुणे



प्राचार्य डॉ. संजय खरात

अहिल्यानगर



प्राचार्य डॉ.सतीशचंद्र सुर्यवंशी

अहिल्यानगर



प्राचार्य डॉ. राजधर टेमकर

नाशिक



प्राचार्य डॉ. संजय सानप

मुंबई



प्राचार्य डॉ. प्रज्ञा प्रभू

ठाणे



प्राचार्य डॉ. सुचित्रा नाईक

ठाणे



प्राचार्य डॉ. अनिता मन्ना

रत्नागिरी



प्राचार्य डॉ. अनिता आवटी

रत्नागिरी



प्राचार्य डॉ. माधव बापट

सिंधुदुर्ग



प्राचार्य डॉ. डी. एल. भारमल

सिंधुदुर्ग



प्राचार्य डॉ. स्मिता सुरवसे

पालघर



प्राचार्य डॉ. भगवान रजपूत

रायगड



प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर

बीड



प्राचार्य डॉ. हरिदास विधाते

बीड



प्रा. डॉ. मोहम्मद इलयास फाजिल

छ. संभाजीनगर



प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे

छ. संभाजीनगर



प्राचार्य डॉ. सुनिल मिरगणे

धाराशिव



प्राचार्य डॉ. संजय अस्वले

धाराशिव



प्राचार्य डॉ. हरिदास फेरे

नांदेड



प्राचार्य डॉ. मोहन खताळ

नांदेड



प्राचार्य डॉ. गणेशचंद्र शिंदे

परभणी



प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव

लातूर



प्राचार्य डॉ. श्रीधर कोल्हे

हिंगोली



प्राचार्य डॉ. मा. मा. जाधव

अकोला



प्राचार्य डॉ. रामेश्वर भिसे

# - प्राचार्य प्रवर्तक -

अमरावती



प्राचार्य डॉ. एच्. आर. देशमुख

अमरावती



प्राचार्य डॉ. विजयकुमार भांगडिया

यवतमाळ



प्राचार्य डॉ. एम.ए.शहेज़ाद

वाशिम



प्राचार्य डॉ.नंदकिशोर ठाकरे

नागपूर



प्राचार्य डॉ. सुजित मेत्रे

नागपूर



प्राचार्य डॉ. ए. एन. श्रीखंडे

भंडारा



प्राचार्य डॉ. अजयकुमार मोहबंसी

गोंदिया



प्राचार्य डॉ. ईश्वर मोहुर्ले

वर्धा



प्राचार्य डॉ. प्रदिप टेकाडे

चंद्रपूर



प्राचार्य डॉ. एल.एस.लडके

चंद्रपूर



प्राचार्य डॉ. प्रमोद काटकर

धुळे



प्राचार्य डॉ. मनोहर पाटील

धुळे



प्राचार्य डॉ. आर. आर. अहिरे

नंदूरबार



प्राचार्य डॉ. महेंद्र रघुवंशी

कोल्हापूर



प्राचार्य डॉ. दत्ता पाटील

सांगली



प्राचार्य डॉ. पूजा नरवाडकर

सोलापूर



प्राचार्य डॉ. शिरीष भोसले

## सेवानिवृत्ती नंतर विशेष सहभाग असणारे मान्यवर

पुणे



मा. प्राचार्य डी. डी. पाटील

नाशिक



मा. प्राचार्य पुंडलिक रसाळ

धुळे



मा. प्राचार्य मनोहर पाटील

अकोला



मा. प्राचार्य व्ही. डी. नानोटी

सिंधुदुर्ग



मा. प्राचार्य चंद्रकांत काकडे

सांगली



मा. प्राचार्य भास्कर ताम्हणकर

मुंबई



मा. प्रा. दुर्गेश फोंडेकर

## - सहविभागीय समन्वयक -

पुणे



प्रा. संदेश कासार

मुंबई



प्रा. डॉ. बबन सिनगारे

छ. संभाजीनगर



प्रा. डॉ. लक्ष्मीनारायण कुरपटवार

अमरावती



प्रा. डॉ. रंजना जिवने

जळगाव



प्रा. डॉ. योगिता चैधरी

नागपूर



प्रा. डॉ. वर्षा वैद्य

# - जिल्हा समन्वयक -

पुणे (ग्रामीण)



प्रा. डॉ. संजय खिलारे

पुणे (शहर)



प्रा. डॉ. ज्योती जोशी

पुणे (शहर)



प्रा. डॉ. सुरेश देवढे

अहिल्यानगर (उत्तर)



प्रा. नवनाथ नागरे

अहिल्यानगर (दक्षिण)



प्रा. डॉ. भागवत परकाळ

नाशिक



प्रा. अक्षय मोरे

नाशिक (शहर)



प्रा. राजेंद्र झोळेकर

नाशिक (तांत्रिक)



प्रो. सीमा रविंद्र बाजी

नाशिक (ग्रामीण)



प्रा. डॉ. आर. डी. खुर्चे

मुंबई



प्रा. स्नेहा जगदाळे

ठाणे (शहर)



प्रा. श्रुती सुनील पाटील

ठाणे (ग्रामीण)



प्रा. हेमंत सुर्यवंशी

रायगड (उत्तर)



प्रा. डॉ. हनुमंतराव जगताप

पालघर (ग्रामीण)



प्रा. तेजस चौधरी

पालघर



प्रा. इर्शाद शेख

रत्नागिरी



प्रा. सुनिल भादुले

रत्नागिरी



प्रा. डॉ. शिवाजी उकरंडे

सिंधुदुर्ग



प्रा. डॉ. अजित दिघे

छ. संभाजीनगर (शहर)



प्रा. डॉ. वैशाली पेरके

छ. संभाजीनगर (ग्रामीण)



प्रा. श्रीकृष्ण परिहार

जालना



प्रा. डॉ. सुनिल इंदुलकर

बीड (ग्रामीण पश्चिम)



प्रा. डॉ. दत्तात्रय नरसाळे

बीड (शहर)



प्रा. डॉ. रविंद्र काळे

बीड (ग्रामीण पूर्व)



प्रा. डॉ. बिजयसिंग भाबरदोडे

धाराशीव (शहर)



प्रा. डॉ. दत्तात्रय साखरे

# - जिल्हा समन्वयक -

धाराशीव (ग्रामीण)



प्रा. डॉ. मंगेश खराटे

नांदेड



प्रा. श्रीकांत धूलेवाड

नांदेड



प्रा. डॉ. माधव चोले

परभणी



प्रा. डॉ. संगीता आवचार

परभणी (ग्रामीण)



प्रा. डॉ. शिवाजी वडचकर

लातूर



प्रा. डॉ. साईनाथ उमाटे

लातूर



प्रा. डॉ. मनोहर चपळे

हिंगोली



डॉ. दयाराम द. मस्के

अमरावती (ग्रामीण)



प्रा. डॉ. उमेश कनेरकर

अमरावती (ग्रामीण)



प्रा. ममता पळसपगार

अमरावती (शहर)



प्रा. डॉ. रेखा मग्गीरवार

यवतमाळ (दक्षिण)



प्रा. राजेंद्र घोडीले

यवतमाळ (पूर्व)



प्रा. डॉ. पंकज चौधरी

वाशिम



प्रा. डॉ. ए. एस. निळे

अकोला



प्रा. डॉ. मिलिंद शिरभाते

अकोला



प्रा. डॉ. तुषार देशमुख

बुलढाणा



प्रा. डॉ. प्रविण डाबरे

बुलढाणा



प्रा. डॉ. विद्याधर अठवार

नागपूर



प्रा. डॉ. उपेंद्र बागूल

नागपूर (ग्रामीण)



प्रा. डॉ. प्रविण लामखाडे

नागपूर (शहर)



प्रा. डॉ. श्रीराम फरताडे

भंडारा



प्रा. डॉ. संदीपकुमार सरैया

गोंदिया



प्रा. डॉ. सद्दाम सय्यद

वर्धा



प्रा. मनोज बनसिंगे

गडचिरोली



प्रा. डॉ. कुंदन दुफारे

# - जिल्हा समन्वयक -

चंद्रपूर (शहर)



प्रा. डॉ. अपर्णा बापूजी धोटे

कोल्हापूर (शहर)



प्रा. डॉ. अरुण पाटील

कोल्हापूर (ग्रामीण)



प्रा. शशिकांत पुपलवाड

सातारा



प्रा. डॉ. संदीप तडाखे

सोलापूर



प्रा. युवराज सोलापूरे

जळगाव (ग्रामीण)



प्रा. डॉ. संजय पाटील

धुळे (उत्तर)



प्रा. डॉ. संभाजी पाटील

धुळे (शहर)



प्रा. डॉ. क्रांती पाटील

नंदुरबार



प्रा. डॉ. एम सिद्दिक नूरमोहम्मद पटेल

नंदुरबार



प्रा. डॉ. डी. एस. पाटील



# - संपादकीय -

एकविसावे शतक हे जागतिकीकरण, खाजगीकरण आणि उदारीकरणाचे शतक म्हणून ओळखले जाते. आज प्रत्येकच क्षेत्रात अमुलाग्र बदल झपाट्याने होत आहे, ही निश्चितच भारताच्या प्रगतीची नांदी ठरणारी बाब आहे. त्यातही उच्च शिक्षण तंत्रज्ञान आणि संशोधनाच्या क्षेत्रात होत असणारे क्रांतिकारी बदल देशाच्या प्रगतीचा आलेख विस्तारण्यास महत्वपूर्ण ठरणारे आहे. कुठल्याही राष्ट्राच्या विकासात तरुणांचा सर्वात मोठा सहभाग असतो त्यामुळे तरुणांना स्वावलंबी बनवून प्रगतीशील व रोजगाराभिमुख युवक निर्माण करणे आपल्या महाराष्ट्राच्या उच्चशिक्षणापुढे सर्वात मोठे आवाहन आहे. त्यात लोकसंख्येचा भयावह प्रश्न दिवसेंदिवस जटील होत आहे.

व्यावसायाभिमुख, रोजगारक्षम व विकासाच्या वाटेवर जाणारा सक्षम युवक घडवतांना शिक्षण व्यवस्थेला साथ देणारा नवतरुण निर्माण करण्यासाठी शिक्षण आणि उद्योग यातील अंतर कमी करण्यासाठी चौकटी बाहेरची पण चौकट सांभाळणारी, आव्हान पेलणारी, जबाबदारी स्वीकारून काम करणारी तरुणाई उभी करणारी करिअर कट्टा नावाची व्यवस्था अथवा उपक्रम या देशात पहिल्यांदा महाराष्ट्रात गेल्या काही वर्षात सातत्याने होत आहे, ही निश्चितच अभिमानाची बाब आहे. स्वतंत्रोत्तर काळात राष्ट्र उभारणी करण्यासाठी लागणारा शासन व उद्योगात सेवा पुरविणारा तरुण शिक्षणातून निर्माण झाला. परंतु २१ व्या शतकात स्वत:च्या पायावर उभा असणारा, जगाच्या वेगासमवेत स्वत:ला जोडून घेणारा तरुण घडविण्याचे आव्हान स्वीकारणारा करिअर कट्टा हा उपक्रम उच्च शिक्षणात प्रकाशाची नवी वाट निर्माण करणारा आहे. त्यासाठी कौशल्य पुरविणारी, उद्योजक घडविणारी मराठी तरुणाईची मानसिकता बदलविणारी, नवीन शैक्षणिक धोरणांचे आव्हान पेलण्यास हातभार लावणारी शासनपुरक व्यवस्था करिअर कट्टा उपक्रमाने स्वीकारली आणि त्यासाठी झपाट्याने उपक्रमशिलता राबविली. स्वामी विवेकानंद, भगतसिंग, ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा तरुणाईवरील विश्वास सार्थ ठरविण्याच्या वाटेवर चालण्याचे व तरुणाईला अनुभवाधिष्ठित, कौशल्याधिष्ठित, स्वयंपूर्ण करणारे सर्वांगीण शिक्षण महाविद्यालये व शासनाला सोबत घेऊन करियर कट्टा हा उपक्रमाद्वारे राबविण्यात माननीय यशवंत शितोळे आणि त्यांच्या संघाचा महनिय वाटा आहे. त्यांच्या अथक प्रयत्नांनी नवीन विश्वास देण्याचे काम शिक्षण क्षेत्रात उभे केले आहे. त्यासाठी तरुणाईच्या विकासाची कास धरणाऱ्या अनेक सेवानिवृत्त व्यक्ती, आजी-माजी IAS, IPS व इतर अधिकारी, उद्योजक, मार्गदर्शक, शासकीय, अशासकीय व्यवस्था या सा-यांना एकत्र आणून त्यांच्या साधनेचा व योगदानाचा स्वीकार करून व तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून महाविद्यालयीन व त्याबाहेरील युवकांना बळ देण्याचे शिवधनुष्य या उपक्रमाच्या निमित्ताने समर्थपणे पेलले आहे. राज्यातील हजारो महाविद्यालयांना एकत्र करणारा, त्यामध्ये स्पर्धात्मकता आणणारा हा आगळावेगळा उपक्रम आहे. सुविधा, मनुष्यबळ, तंत्रज्ञान, व्यावसायिक संधीचे मार्गदर्शन या यंत्रणा उभ्या करून समस्येचे निराकरण करणारा हा उपक्रम केवळ नवखा नाही तर राज्याच्या शिक्षणात मैलाचा दगड ठरताना दिसत आहे. त्याचे उत्तम परिणाम झपाट्याने दिसायला लागले आहे.

या आगळ्यावेगळ्या पण समस्येला उत्तर देणाऱ्या उपक्रमाची एक ताकद म्हणजे संवाद, संवादासाठी करिअर कट्टाच्या वतीने विद्यार्थी संसद, प्राचार्य प्रवर्तक, समन्वयक यासोबत माहितीपुस्तिका आणि करिअर कट्टा मासिक मोलाची भूमिका पार पाडत आहे. या माहिती पुस्तिकेच्या माध्यमातून करिअर कट्टाचे नवीन शैक्षणिक धोरणामध्ये असलेले कौशल्य विकसित करण्यासाठी विद्यार्थ्यांसाठी आवश्यक उपक्रम तसेच महाविद्यालयीन उपक्रम, करिअर कट्टा पदाधिकारी यांची कार्यपद्धती, नोंदणी प्रक्रिया, संपूर्ण वर्षभर घेण्यात येणाऱ्या कार्यक्रमाची दिनदर्शिका याची संपूर्ण माहिती या पुस्तिकेत दिलेली आहे. या संपादनाची राज्यस्तरीय जबाबदारी करिअर कट्टाने मला सोपविली ही माझ्यासाठी सन्मानाची बाब आहे. त्यासाठी संपादकीय मंडळ उमेदीने व प्रभावीपणे काम करण्यासाठी सज्ज आहे. करिअर कट्टा उपक्रमात सहभागी होऊन त्याचा पुरेपुर लाभ घ्यावा, त्यातून स्वत:ला आणि राष्ट्राला उभे करण्यात हातभार लावावा हे आवाहन यानिमित्ताने महाविद्यालयीन तरुणाईला करतांना मला आनंद होत आहे. ही माहिती पुस्तिका विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक ठरेल याची निश्चितच खात्री आहे.

**प्राचार्य डॉ. शरयू ब. तायवाडे**
विभागीय प्राचार्य प्रवर्तक नागपूर विभाग

# करिअर कट्टाचे विद्यार्थ्यांसाठीचे उपक्रम

## आय. ए. एस. आपल्या भेटीला

(स्पर्धा परीक्षेबाबत राबवले जाणारे उपक्रम)

या उपक्रमांतर्गत पदवीच्या पहिल्या वर्षात प्रवेशित विद्यार्थ्यांच्या पहिल्या सेमिस्टर मध्ये ३० तासांचा दोन क्रेडिट साठीचा एक कोर्स दिला जाईल. यामध्ये केंद्र शासन, राज्य शासन, सार्वजनिक क्षेत्रातील कंपनी या सर्व ठिकाणी असणाऱ्या नोकरीच्या संधी, त्यांचे परीक्षा पद्धती, त्यांचा अभ्यासक्रम व तयारी करण्याचे नियोजनबद्ध पद्धती, याविषयी मार्गदर्शन करणारा एक कोर्स दिला जाईल.

१. कोणत्याही पद्धतीच्या स्पर्धा परीक्षा देत असताना आवश्यक असणाऱ्या अभ्यासक्रमाचा समावेश असणारा स्पर्धा परीक्षा फाउंडेशन कोर्स (२५० तास) हा पदवीच्या पहिल्या वर्षाच्या विद्यार्थ्यांना दिला जाईल. संध्याकाळी ५.०० ते ६.०० दररोज १ तास.

२. बँकिंग क्षेत्रातील नोकरीच्या संधीसाठी इच्छुक असणाऱ्या विद्यार्थ्यांना १२० तासांचा बँकिंग परीक्षेची तयारी करण्याचा अभ्यासक्रम पदवीच्या दुसया वर्षातील विद्यार्थ्यांना दिला जाईल.

३. पोलीस भरती प्रशिक्षणासाठी इच्छुक असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी १२० तासांचा लेखी परीक्षेची तयारी करणारा अभ्यासक्रम पदवीच्या दुसया वर्षाला असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून दिला जाईल.

४. UPSC आणि MPSC च्या माध्यमातून स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी २५० तासांचा ॲडव्हान्स कोर्स उपलब्ध करून दिला जाईल.

५. सर्व पद्धतीच्या स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी आवश्यक सराव चाचणी परीक्षा महिन्यातून एक या पद्धतीने घेतल्या जातील.

६. स्पर्धा परीक्षा विषयी तयारी करत असताना योग्य मार्गदर्शन मिळावं यापेक्षा तज्ज्ञ प्रशिक्षकांच्या बरोबरच आजी-माजी सनदी अधिकारी (IAS, IPS, IRS, IFS) यांचे ऑनलाईन मार्गदर्शन उपलब्ध करून दिले जाईल. आठवड्याला एक या पद्धतीने ५२ अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन दिले जाईल. विद्यार्थ्यांना वेळोवेळी शासकीय नोकर भरतीसाठी निघालेल्या जाहिरातीची माहिती देणे त्यांचे कागदपत्र तयार करण्यासाठीची माहिती देणे तसेच तांत्रिक बाबींची पूर्तता करून फॉर्म भरण्यापर्यंतची सर्व माहिती ऑनलाईन पद्धतीने उपलब्ध करून देण्यात येईल. जिल्हा पातळीवर असणाऱ्या अधिकाऱ्यांच्या तसेच निवृत्त अधिकाऱ्यांच्या मुलाखतीच्या माध्यमातून स्पर्धा परीक्षा विषयी फील्ड व्हिजीट आयोजित करून मुलांना जाणीव जागृतीचे काम केले जाईल.

# करिअर कट्टाचे विद्यार्थ्यांसाठीचे उपक्रम

## उद्योजक आपल्या भेटीला

महाविद्यालयातील युवकांचा उद्योग क्षेत्रातील सहभाग वाढावा, त्यांना व्यवसाय सुरु करण्यासाठी लागणाऱ्या आवश्यक कौशल्यांचा विकास करण्यासाठी उद्योजक आपल्या भेटीला या उपक्रमाचे आयोजन महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे. जगभरातील उद्योग क्षेत्रातील चालू असणाऱ्या घडामोडी, देशांतर्गत व्यवसाय क्षेत्रात असणाऱ्या संधी, व्यवसाय सुरु करण्याची प्रक्रिया संबंधीची माहिती अतिशय सोप्या पद्धतीने या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना दिली जाते. हा उपक्रम संपूर्ण महाराष्ट्र राज्यात राबवले जात आहे. महाविद्यालयांमध्ये अस्तित्वात असणाऱ्या उद्योजक विकास विभागाशी हा उपक्रम संलग्नित करुन सहज राबवता येणार आहे. या अंतर्गत विविध बँकांचे प्रतिनिधी, वेगवेगळ्या क्षेत्रातील यशस्वी उद्योजक, प्रशासकीय विभागाचे अधिकारी व तज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना मातृभाषामध्ये उपलब्ध करुन दिले जात आहे. उद्योजक है औद्योगिकीकरणाचे आधारस्तंभ म्हणून ओळखले जातात. आज देशाला गरज आहे ती उद्योजकता विकासाची. उद्योजक हे देशाच्या आर्थिक व सामाजिक विकासाला हातभार लावत असतात. उद्योजकाला योग्य असे नियोजन करावे लागते व कौशल्याचा आणि तंत्रज्ञानाचा वापर करून परिणामकारक रचना करावी लागते. या उपक्रमाद्वारे देशात उद्योजकता तयार होण्यासाठी उद्योजकीय संस्कार व उद्योजकीय प्रशिक्षण देऊन उद्योजक निर्माण करण्यासाठी उद्योजक आपल्या भेटीला या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

उद्योजक आपल्या भेटीला या उपक्रमांतर्गत उद्योजक, बँकिंग अधिकारी, व्यावसायिक सल्लागार व शासकीय योजनांचा समावेश आहे. वर्षातून ५२ उद्योजक व संबंधित विषयाचे अभ्यासक्रम उपलब्ध असणार आहेत.

## उद्योग संसद



# गर्जे मराठी ग्लोबल आणि करिअर कट्टा

करिअर कट्टा या उपक्रमांतर्गत महाराष्ट्रातील युवकांना आंतरराष्ट्रीय पातळीवर उद्योग आणि व्यवसाय क्षेत्रामध्ये होत असलेल्या घडामोडींची माहिती मिळावी, त्यांना आंतरराष्ट्रीय पातळीवरील संधी मिळवण्यासाठी आवश्यक तज्ज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन मिळावे या उद्देशाने 'गर्जे मराठी ग्लोबल' या अमेरिकेमध्ये स्थापन झालेल्या संस्थेसोबत करिअर कट्ट्याने सामंजस्य करार केलेला आहे. या सामंजस्य करारांतर्गत गर्जे मराठी ग्लोबलशी संलग्न असणाऱ्या शंभरहून अधिक देशातील मराठी उद्योजक व व्यावसायिकांचे मार्गदर्शन प्रशिक्षण करिअर कट्ट्याशी संलग्न महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिले जाणार आहे. १०० वेगवेगळ्या देशातील उद्योजकांनी उद्योजकीय कौशल्यांवर आधारित एक कोर्स निर्मिती केलेली आहे. यामध्ये वेगवेगळ्या बहुराष्ट्रीय कंपन्यांमधील पदाधिकारी तज्ज्ञ मार्गदर्शक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी उपलब्ध असणार आहेत.

गर्जे मराठी ग्लोबलचे अध्यक्ष मा. आनंद गानू, सचिन इटकर, विजय तलेले या मान्यवरांनी हा उपक्रम जास्तीत जास्त विद्यार्थीप्रिय व्हावा या उद्देशाने आंतरराष्ट्रीय पातळीवरील लोकांना एकत्र करण्याबरोबरच 'माझा जिल्हा – माझा अभिमान' या उपक्रमांतर्गत प्रत्येक जिल्ह्यातील भारताबाहेर गेलेल्या उद्योजक व व्यवसायिकांना एकत्र करून यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांशी ऑनलाइन आणि ऑफलाइन पद्धतीने प्रत्येक महिन्याला समन्वय बैठक घडवून आणण्याचे नियोजन देखील केलेले आहे. या माध्यमातून दर शनिवारी गर्जे मराठी ग्लोबल आणि करिअर कट्टा यांच्या वतीने संवाद शृंखला राबवली जाते. दर महिन्यातून एकदा जिल्ह्यातील सर्व जिल्हा नियोजन समितीचे पदाधिकारी, करिअर संसदेचे विद्यार्थी आणि माझा जिल्हा– माझा अभिमान या उपक्रमांतर्गत या जिल्ह्याच्या ग्रुपमध्ये असणारे सर्व प्रशासकीय अधिकारी आणि उद्योजक यांची एकत्रित बैठक होईल आणि विद्यार्थ्यांना आवश्यक असणाऱ्या उपक्रमाची निर्मिती करून ते यशस्वीपणे राबवण्याचं काम या सामंजस्य करारांतर्गत केले जाणार आहे. महाविद्यालयाच्या गुणवत्ता वाढीमध्ये नक्कीच १०० वेगवेगळ्या देशातील उद्योजकांचा समावेश असलेला उपक्रम राबवणे एक अभिमानाची बाब असू शकते.

**प्रा.सायली लाखे पिंदळी**
सदस्य,राज्यस्तरीय प्रकाशन संपादकीय समिती

# मधुर क्रांती

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांतर्गत स्थानिक पातळीवरील रोजगार निर्मितीचे उद्दिष्ट पूर्ण करण्याच्या विचाराने मुंबईसह अनेक विद्यापीठांनी आपल्या वेगवेगळ्या व्हर्टिकलमध्ये मधुमक्षिका पालनाचा दोन क्रेडिटचा कोर्स तयार केलेला आहे. निश्चितच या कोर्सच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना त्या क्षेत्रातील अद्यावत ज्ञान मिळण्यासाठी फायदा होत आहे. पण या विषयांना प्रत्यक्ष प्रशिक्षणाची जोड मिळाल्यास यातून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होऊ शकते. हा विचार सिंधुदुर्ग जिल्ह्याचे जिल्हा समन्वयक डॉ. अजित दिघे यांनी करिअर कट्टाच्या राज्यस्तरीय समितीसमोर ठेवला आणि यातून 'मधुर क्रांती' या उपक्रमास मुर्त स्वरुप देण्यात येणार आहे. खादी व ग्रामोद्योग मंडळ महाराष्ट्र शासन यांच्या सहकार्याने राज्यातील १00 हून अधिक महाविद्यालयामध्ये प्रत्येकी ५0 मधूमक्षिका पालनासाठीच्या पेट्या असणारे मधकेंद्र मधुर क्रांती अंतर्गत तयार केले जाणार आहे.

यामध्ये शासनाकडून दिली जाणार ५0% अनुदान, २५% महाविद्यालयाचा सहभाग आणि २५% सीएसआर या पद्धतीने या प्रशिक्षण केंद्राची निर्मिती केली जाणार आहे.

यासाठी सहा दिवसाचा 'फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम' विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार मान्यता घेऊन केला जाणार आहे. या माध्यमातून ज्या ठिकाणी मधुमक्षिका पालन या व्यवसायासाठी पोषक वातावरण आहे अशा १00 हून अधिक तालुक्यांमधील महाविद्यालयांची निवड करून त्यांच्या प्राध्यापकांना फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम या अंतर्गत प्रशिक्षण देऊन, खादी ग्रामोद्योग मंडळाच्या स्थानिक पातळीवरील प्रशिक्षकांचा सहभाग मिळवून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रतिवर्षी किमान ३0000 तरुणांना 'मधुर क्रांती' या उपक्रमांतर्गत प्रशिक्षण देण्याचे नियोजित केलेले आहे. सदर उपक्रमांतर्गत महाविद्यालयाची निवड प्रक्रिया राज्यस्तरीय समिती यांच्याद्वारे केली जाईल.

# करिअर कट्टा मासिक

करिअर कट्टा हा महाराष्ट्र राज्यातील विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणासाठी आणि उज्वल भवितव्यासाठी एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि सातत्याने प्रयोगशील असा उपक्रम आहे.

या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्व विकास, कौशल्य विकास, उद्योजकता विकास आणि स्पर्धा परीक्षांची तयारी करण्याची संधी मिळते. करिअर कट्टा मासिक हे अत्यंत अभिनव संकल्पना विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे एक साधन ठरेल.

'युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी' हे ब्रीदवाक्य असलेला करिअर कट्टा हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना त्या बरोबरीने त्यांच्या सर्वच कलागुणांना कायमच महत्व देत असतो. करिअर कट्टा मासिक या उपक्रमामुळे महाराष्ट्र राज्यातील विद्यार्थी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर व्यावसायिक जगात टिकणारे आणि यशस्वी व्यावसायिक होऊ शकतात अशा प्रकारच्या संकल्पनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना उज्वल भवितव्य निर्माण करण्याची संधी या माध्यमातून मिळणार आहे. येत्या, जून २०२५ पासून करिअर कट्टा मासिक या उपक्रमाचा शुभारंभ होणार आहे. याचा फायदा केवळ विद्यार्थ्यांना होईल असे नाही तर, महाविद्यालयाचे प्राचार्य आणि समन्वयक या सगळ्यांनाच याचा निश्चितच फायदा होईल.

सदर मासिक विद्यार्थ्यांच्या वैचारिक क्षमतेत सकारात्मक भर घालणारे ठरेल.

या मासिकाच्या स्वरूपाविषयी सांगताना काही बाबी ठळकपणे नमूद कराव्या वाटतात त्या अशा की, या मासिकामध्ये आंतरराष्ट्रीय पातळीवरील उद्योग जगतामध्ये घडलेल्या घडामोडींचा वृत्तांत व मराठी उद्योजकांची यशोगाथा त्यांचा संपूर्ण प्रवास थेट अमेरिकेतून अध्यक्ष डॉ. आनंद गाणू यांच्या 'गर्जे मराठी ग्लोबल' यांच्या माध्यमातून अनेक तज्ञ व्यक्तींच्या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांना याचा लाभ घेता येणार आहे त्यांचे विचार श्रवण करण्यासोबतच ते मासिकाच्या माध्यमातून वाचताही येणार आहेत.

संपूर्ण महिनाभरामध्ये घडलेल्या घटनांचा स्पर्धा परीक्षेच्या दृष्टिकोनातून घेतलेला चालू घडामोडींचा आढावा मा. श्रीकांत इंगळे ह्यांचा लेख अत्यंत वाचनीय ठरणारा आहे. आंतरराष्ट्रीय लोकसेवा आयोग आणि संघ लोकसेवा आयोग या परीक्षा कशा पद्धतीने यशस्वी केल्यात हे अनुभव आणि सेवेत असताना कार्यनिष्ठा जोपासत उभ्या झालेल्या मा. तुषाबा शिंदे ( IRPS इंडियन रेल्वे पर्सोनल दिल्ली ) ह्या जेष्ठ मान्यवरांचे प्रगल्भ मार्गदर्शनपर लेखांचा समावेश या मासिकेमध्ये असणार आहे. ज्याचा विद्यार्थ्यांना अनेक पद्धतीने लाभ होणार आहे.

# करिअर कट्टा मासिक

विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासाच्या दृष्टिकोनातून अनेक सर्जनशील उपक्रम महाविद्यालयीन पातळीवर कसे राबविले जावे यासाठी कायम प्रयत्नशील असणारे व्यक्तिमत्व मा. प्राचार्य डॉ. शरयू तायवाडे ह्यांचा लेख त्याचप्रमाणे, व्यक्तिमत्व विकासातून करिअरचा राजमार्ग कसा निवडायचा मा. राजीव नंदकर (यशदा) ह्यांचा सखोल अभ्यासपूर्ण लेख या मासिकेमध्ये असणार आहे.

स्वकर्तुत्वाने उद्योग क्षेत्रात भरारी घेणाऱ्या नवीन उद्योजकांची मुलाखत तर करिअर कट्टा च्या माध्यमातून तरुणांनी संपादित केलेल यश यावर आधारित लेख असणार आहे.

प्रत्येक महिन्यामध्ये निघालेल्या शासकीय नोकरीच्या जाहिराती व खाजगी क्षेत्रातील रोजगाराच्या संधी याबाबत माहितीपूर्ण लेख असणार आहे. तर, देशाच्या प्रशासनामध्ये कार्यरत असणाऱ्या ज्येष्ठ अधिकाऱ्यांची निमंत्रित संपादक म्हणून लेख असणार आहेत त्याचप्रमाणे, आंतरराष्ट्रीय घडामोडी व सुरक्षा धोरण संशोधन यावर आधारित ज्येष्ठ विचारवंत संचालक उच्च शिक्षण महाराष्ट्र शासन सन्माननीय डॉ. शैलेंद्र देवळाणकर ह्यांचा अभ्यासपूर्ण लेख या मासिकेमध्ये असणार आहे. तसेच, स्पर्धा परीक्षांची तयारी करत असताना मुलाखतीचे तंत्र यावर आधारित मा. महेश भागवत ह्यांचा माहितीपूर्ण लेख तर संपूर्ण अंकावर आधारित प्रश्न मंजुषा या मासिकामध्ये असणार आहे. त्याचप्रमाणे, करिअर संसदेच्या कामाचा लेखाजोखा याची माहिती देणारा सविस्तर लेख असेल. एकूणच करिअर कट्टा मासिक हे करिअर कट्टा यांच्याद्वारे प्रकाशित केले जाणार आहे. शिक्षणाची गुणवत्ता आणि कौशल्य विकास उपक्रमांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावणारे हे मासिक ठरेल आणि म्हणूनच तरुणाईला खऱ्या अर्थाने पथदर्शक ठरणारे हे मासिक असेल हा विश्वास वाटतो.

प्रा. सायली लाखे पिदळी

सदस्य, राज्यस्तरीय प्रकाशन संपादकीय समिती

# करिअर डायरी आणि स्वयं मूल्यमापन

या स्पर्धेच्या आणि तंत्रज्ञानाच्या युगात करिअर प्लॅनिंग करणे अतिशय महत्त्वाचे आहे त्यासाठी आपली आवड, आपली कौशल्य आपले छंद याची जाणीव असणे तेवढेच गरजेचे आहे. आपले स्वतःचेच मूल्यमापन करताना आपल्या प्रगतीचे, कौशल्याचे आणि आवडीचे विश्लेषण करणे तेवढेच महत्त्वाचे आहे. आपल्या प्रगतीचे आत्मचिंतन करण्यासाठी करिअर डायरी आपल्याला मदत करते. बरेचदा आपली योग्य क्षमता आणि आवश्यकता याची जाणीव आपल्याला नसते आणि मग करिअर डायरी लिहिताना या सगळ्यांची जाणीव आपल्याला होते आणि आपलीच जबाबदारी आपल्याला कळते. या सगळ्यांचा उपयोग आपल्या करिअर निवड करण्यासाठी सुद्धा या स्पर्धेच्या युगात होऊ शकतो .

**Plan A- Plan B -**

करिअरची निवड करताना प्रत्येकाने योजना अ **(Plan A)**आणि योजना ब **(Plan B)** दोन्हीही करणे गरजेचे आहे कारण एक निवड चुकली तर पश्चाताप न करता दुसरी निवड ही आम्हाला करिअरचा मार्ग दाखवू शकते. प्रत्येकजण यशस्वी होण्यासाठी धडपडत असतो आणि आपले प्रत्येकाचे जीवन आशावादाच्या डोलाऱ्यावर उभे असते पण प्रत्येकालाच यश मिळतेच असं नाही आणि म्हणून आयुष्याचे नियोजन करत असताना फक्त प्लॅन ए तयार करून चालणार नाही कारण प्लॅन ए मध्ये अयशस्वी झालं किंवा अपयश आले तर पूर्णपणे खचून न जाता आपण आपल्याकडे कायम प्लॅन बी तयार ठेवला तर अडचणीच्या वेळी हाच प्लॅन बी आपल्याला कामी येतो. प्लॅन ए ज्याप्रमाणे ठरवला त्याप्रमाणे पूर्ण झाला नाही याला प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे अनेक घटक कारणीभूत असतात पण त्यामुळे खचून न जाता आपण आपल्या समोर असलेला प्लॅन बी चा विचार करावा लागेल आणि कुठेही खचून न जाता प्लॅन बी साठी प्रयत्न करावे लागेल. प्लॅन ए आणि प्लॅन बी हे सोबतच करणे आवश्यक असते. आपल्या प्रयत्नांना कष्टाची जोड देऊन आपण प्लॅन बी योग्य वेळी वापर केला तर आपले आयुष्य सरळ साधे आणि सुखकर होईल.

**एक महिना एक कौशल्य–** या संकल्पनेमुळे प्रत्येक विद्यार्थ्याने शिकतानाच जर दर महिन्याला एक कौशल्य मिळवण्याचा प्रयत्न तर या माध्यमातून आपल्या ज्ञानाची आणि सोबतच कौशल्याची विस्तृत श्रेणी विद्यार्थी विकसित करू शकते. खरं म्हणजे कला आणि कौशल्य दोन्हीही वेगळे आहेत कला ईश्वरी देणगी आहे तर कौशल्य कष्ट करून मिळवायचे आहे पण कलेला कौशल्याचे अंग असावेच लागते आणि म्हणून आपले आयुष्य सुखकर करण्यासाठी व्यावसायिक, व्यावहारिक कौशल्य आत्मसात केली तर विद्यार्थ्यांचा जीवन आणि कामाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलण्यास या कौशल्यामुळे मदत होईल तर शिकत असतानाच ही नवनवीन कौशल्य विद्यार्थ्यांमध्ये व्यावसायिक क्षमतेसाठी असलेली शिक्षण कौशल्य जर आपण आत्मसात केली त्यावर चिंतन केले तर ही कौशल्य आपल्यामधील असलेली आत्म जागरूकता वाढवून प्रतिभा, मूल्ये आणि रुची वाढवतील व तुम्हाला करिअर निवडण्यास याची नक्कीच मदत होईल.

### विशेष भेट आणि मुलाखत–

प्रत्येक महिन्याला विद्यार्थांने आपल्या क्षेत्रात यशस्वी असलेल्या एका नामवंत व्यक्तीची मुलाखत घ्यायची आहे. मुलाखत हे इतरांचे ज्ञान कौशल्य मिळवण्याचा एक सामान्य मार्ग आहे. मुलाखती द्वारे प्रभावी संवाद आणि इतर विचार कौशल्यांचा सराव करण्यास एक चांगला मार्ग मिळतो. मुलाखत घेताना आपल्या इतर सदस्यांसोबत असलेले टीमवर्क मधील योगदान तसेच ज्या परिस्थितीत आपण आहोत त्याचा विचार करता ती स्थिती समजून घेणे आणि ज्यांची मुलाखत आपण घेतोय त्यांच्या त्यावेळेच्या परिस्थितीशी आपण आजची परिस्थिती कनेक्ट करणे त्यामुळे या व्यक्तीच्या जीवनातील संघर्ष तुम्हालाही तुमच्या आयुष्यातील संघर्षाची जाणीव करून देतील, आणि मग आपल्या संघर्षापेक्षाही ज्या व्यक्तीची मुलाखत घेत आहोत त्या व्यक्तींने आपल्या आयुष्यात भोगलेल्या भोगवट्याबद्दल जेव्हा आपल्याला माहिती होते, तेव्हा आपला संघर्ष संघर्षच राहत नाही. अत्यंत पराकाष्ठेतून, प्रयत्नातून, संघर्षातून यश प्राप्त करणाऱ्या माणसाने ते यश कशाप्रकारे प्राप्त केले, अत्यंत संकटाच्या वेळी त्यांनी कशाप्रकारे निर्णय घेतले, संकटाने कोसळून न जाता त्यावेळी त्याला जीवन जगण्याबद्दलची संघर्षावर मात करण्याची प्रेरणा नेमकी कुठून मिळाली ह्या सगळ्या गोष्टीचे सूक्ष्म कंगोरे मुलाखतीच्या माध्यमातून उलगडले जातात. एखाद्या नामवंत यशस्वी व्यक्तिमत्त्वाचं जीवन आपल्याला संपूर्णतः कळते. त्यांच्या आयुष्यातील अनेकांना माहीत नसलेल्या गोष्टी मुलाखतीच्या माध्यमातून माहीत होतात. मुलाखतीतून व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वातील अनेक गुणदोषांची चिंतन चिकित्सा होत असते. ज्या व्यक्तीची मुलाखत आपण घेतो त्या व्यक्तीचा एकूणच आयुष्य प्रवास त्या व्यक्तीचे सर्वांग सुंदर अथवा संघर्षमय असे व्यक्तिमत्व, त्या व्यक्तिमत्त्वातील अनेक सूक्ष्मातीसूक्ष्म पैलू याचे दर्शन अत्यंत कुशलतेने घडविण्याचे काम मुलाखतीच्या माध्यमातून होत असते.

### एक महिना एक पुस्तक–

प्रत्येक महिन्याला जर एक पुस्तक किंवा ग्रंथ वाचला तर वाचनाची आवड वाढते आणि नियमित वाचनाची सवय लागते, एवढेच नव्हे तर ज्ञान वाढवण्यासाठी आणि मानसिक क्षमता सुधारण्यासाठी सुद्धा खूप उपयोगी पडते. एका महिन्याला एक पुस्तक वाचल्याने आपले ज्ञान आणि विचारसरणी समृद्ध होऊ शकते तर वाचनामुळे आपण न अनुभवलेलं आयुष्य आपलाला वाचता येते. त्या ग्रंथाचे वाचन करीत असताना आपल्यातील नकारात्मक भावना संपुष्टात येतात आणि एक सकारात्मक दृष्टिकोन तयार होतो. आपण ग्रंथा मधून जी जीवनमूल्य वाचत असतो अप्रत्यक्षपणे त्या मूल्यांना आपण अंतःकरणात रुजवत जात असतो.

# करिअर डायरी आणि स्वयं मूल्यमापन

आपल्यातील सर्जनशील जाणिवा विकसित होत जातात. त्या ग्रंथातून त्याकाळचा इतिहास, तत्कालीन सामाजिक परिस्थिती, जो ग्रंथ वाचतो त्यातील भूगोल, त्या ग्रंथातील व्यक्तिदर्शन यामुळे जीवनजाणिवा अधिक विकसित होत जातात. भाषा सुद्धा व्याकरण दृष्ट्या अधिक समृद्ध होत जात असते अशा अनेक प्रकारचे फायदे प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे ग्रंथ वाचनाने होत असतात. ग्रंथ वाचनामुळे बुद्धीला चालना प्राप्त होते ज्ञानाला गती प्राप्त होते आणि भावविचार अधिक परिपक्व होत जातात. कधी कधी प्रचंड दुःखाचा डोंगर कोसळला असताना सुद्धा ग्रंथ वाचनाने आपल्या मानसिकतेमध्ये सकारात्मक बदल होऊन आपण प्रसन्न आणि सुखी होऊ शकतो. हा प्रचंड विश्वास ग्रंथाच्या वाचनाने प्राप्त झालेला दिसून येतो. काही मार्गदर्शक पुस्तके आपण वाचली तर आपण या आयुष्यात काहीही करू शकतो आई वडिलांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी असलेली तळमळ या ग्रंथातून वाचलेल्या मार्गदर्शनातून आपल्याला आयुष्याचा पुढील मार्ग दाखवू शकते. जर आपण आत्मकथा वाचल्या तर त्यातून आपल्याला प्रेरणा मिळू शकते आपल्यापेक्षा जास्त अडचणी एखाद्याला असू शकतात याची ही जाणीव होते

करीअर कट्टाची ही करीअर डायरी विद्यार्थी जीवनात चिंतन करण्याची सवय लावते. आपल्या प्रगतीचे आत्मचिंतन करण्यास करिअर डायरी मदत करते. आपले स्वतःचे मूल्यमापन करताना आपल्या प्रगतीचे आपल्या कौशल्याचे आणि आवडीचे विश्लेषण या करिअर डायरीतून आपल्याला करता येते. कौशल्य, छंद, यशस्वी व्यक्ती, उत्तम ग्रंथ या सगळ्यामुळे नव्याने आपली ओळख आपल्यालाच होते.

**डॉ. वर्षा वैद्य**
तायवाडे कॉलेज कोराडी, नागपूर
सहविभागीय समन्वयक, नागपूर विभाग

# विद्यार्थ्यांसाठी माहिती पत्रक



# कौशल्य प्रशिक्षण उपक्रम

करिअर कट्टाच्या वतीने ॲग्रिकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्ट बारामतीच्या सहकार्याने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये कृषी उद्योजकीय कौशल्य वाढीस लागावे विशेषतः कृषी क्षेत्रातील नवनवीन तंत्रज्ञान त्यांनी आत्मसात करावे व त्यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत हे तंत्रज्ञान पोहोचून त्यांच्या उत्पन्न वाढीसाठी मदत व्हावी. या उद्देशाने कृषी क्षेत्रामध्ये उपलब्ध असणाऱ्या विविध रोजगाराच्या संधींची माहिती देण्याबरोबरच आर्टिफिशियल इंटेलिजन्स वर आधारित उत्पन्न वाढीची प्रक्रिया ॲग्रिकल्चर ड्रोन फ्लाईंग **(Agriculture Drone Repair, Maintenance And Operating Skill Development)** चे पूर्ण प्रशिक्षण आणि अधिकृत परवाना आणि मिलेट्स प्रोसेसिंग **(Millets Processing)** युनिट बद्दलची संपूर्ण माहिती व स्थापनेसाठीची आवश्यक असणारी संपूर्ण प्रक्रिया तसेच **Agriculture E - Commerce** याबाबतचे परिपूर्ण निवासी प्रशिक्षण देण्यासाठी हा उपक्रम कृषी उद्योजकता कौशल्य विकास कार्यक्रम या नावाने केला जातो. या अंतर्गत प्रथम बॅच मध्ये १०० विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण पूर्ण झाले असून येणाऱ्या कालावधीमध्ये प्रत्येक तालुक्यातून पाच विद्यार्थी असे एकूण चौदाशे पेक्षा जास्त विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण या उपक्रमांतर्गत आयोजित केले जाणार आहे. सीएसआर **(CSR)** अंतर्गत सुरू असणाऱ्या उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांनी आत्मनिर्भर व्हावे व स्वतःच्या उद्योग व्यवसायाच्या माध्यमातून इतरांना नोकरी उपलब्ध करून द्यावी या उद्देशाने विद्यार्थ्यांना घडविण्याचा प्रयत्न या माध्यमातून केला जातो.

या सगळ्यात महत्वाची भूमिका असणारे, बारामती येथील ॲग्रिकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्टचे कृषी विज्ञान केंद्र आणि शैक्षणिक संकुलातील शारदाबाई पवार महिला आर्टस् कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, येथील अटल इन्क्यूबेशन सेंटर, सेंटर ऑफ एक्सलन्स, डेअरी आणि फूड प्रोसेसिंग ही सेवाकेंद्रे महाराष्ट्रातील शेतकरी आणि विद्यार्थ्यांकरिता कृषीजन्य उद्योगाचे प्रशिक्षण घेण्याकरिता मौलिक ठरले आहेत. यामधून शेतीकडे पारंपारिक नजरेतून न बघता स्वतःला परंपरागत शेतकरी न समजता विद्यार्थ्यांनी स्वतःला कृषी उद्योजक म्हणून बघायला पाहिजे हा दृष्टिकोन विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होणार आहे आणि हेच या कृषी उद्योजक कौशल्य विकास या उपक्रमाचे फलित असेल.

# फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम (FDP)

फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम (FDP) हे प्राध्यापकांना अधिक प्रभावी आणि आधुनिक शिक्षण पद्धतीची जोड देऊन नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करण्याकरिता तसेच त्यांचा विद्यार्थ्यांवर होणाऱ्या सकारात्मक परिणामासाठी हा प्रोग्राम अत्यावश्यक आहे. महाराष्ट्रभरातील दौऱ्यादरम्यान सध्याच्या युगात विद्यार्थ्यांना त्यांच्या पूर्ण क्षमतेपर्यंत पोहोचण्यास मदत करण्यासाठी अनुकूल आणि नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धतींची आवश्यकता आहे ही बाब लक्षात घेता महाराष्ट्रभर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता चालू असणाऱ्या करिअर कट्टा या उपक्रम अंतर्गत महाराष्ट्रभरातील प्राध्यापक वर्ग यांच्या करिता UGC -Malaviya Mission Teacher Training Centre (UGC -MMTTC) यांच्या सहकार्याने फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम (FDP) आयोजित करण्यात येत आहेत. फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम (FDP) चा प्राध्यापक वर्ग यांना करिअर ॲडव्हान्समेंट स्कीम (CAS) मध्ये नक्कीच फायदा होतो. FDP प्राध्यापकांना त्यांच्या ज्ञानास आणि कौशल्यास अधिक सक्षम बनवण्यास मदत करते, तर CAS मध्ये पदोन्नती आणि वेतन वाढ होण्यास मदत होते.

करिअर कट्टा उपक्रम अंतर्गत विविध आयोजित FDP खालीलप्रमाणे.............

## १] भावनिक बुद्धिमत्ता (Emotional Intelligence)

उच्च शिक्षणातील प्राध्यापक वर्ग यांच्याकरिता 'भावनिक बुद्धिमत्ता' या विषयावर फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम (FDP) हा प्राध्यापकांच्या भावनिक क्षमता वाढवण्यासाठी डिझाइन केलेला एक उल्लेखनीय उपक्रम आहे, ज्यामुळे अध्यापन आणि वैयक्तिक जीवनात असणाऱ्या भावना यांची सांगड चांगल्या प्रकारे घालण्यास मदत होते. या अंतर्गत स्वतःची जाणीव (Self-awareness), इतरांची भावना समजून घेणे (Empathy), संवाद कौशल्ये (Communication skills), कक्षा व्यवस्थापन (Classroom management), शिक्षक आणि विद्यार्थ्यांचे संबंध (Teacher-student relationship) अश्या बऱ्याच घटकांवर सकारात्मक प्रभाव पडतो.

## २] डिझाईन थिंकिंग

शिक्षणात डिझाईन थिंकिंग हा एक शक्तिशाली दृष्टिकोन आहे ज्यामध्ये वाढीव समज, सहानुभूती आणि समस्या सोडवणे, सहयोग आणि नवोपक्रम यावर लक्ष केंद्रित करणारी मानसिकता आणि कार्यपद्धती समाविष्ट आहे. ते आव्हाने ओळखण्यासाठी, माहिती गोळा आणि उपाय तयार करण्यासाठी, कल्पना परिष्कृत करण्यासाठी आणि त्या उपायांची चाचणी करण्यासाठी एक संरचित चौकट देते. डिझाइन थिंकिंग विविध शैक्षणिक संदर्भांमध्ये लवचिकपणे अंमलात आणता येते, क्रियाकलापांसाठी, गट प्रकल्पांसाठी किंवा अगदी अभ्यासक्रम डिझाइनसाठी रोडमॅप म्हणून काम करते.

### ३] ग्रंथालयातील विद्यार्थ्यांवर परिणाम करणारे घटक [ग्रंथपालांकरिता]

ग्रंथालय हे विद्येचे माहेरघर असून तिथे शिस्तीचे पालन, ज्ञानग्रहण होणे गरजेचे आहे. जसजसे तंत्रज्ञान विकसित होत आहे त्यानुसार प्रत्येक क्षेत्रात प्रचंड क्रांती घडून येत असून आजच्या विद्यार्थ्याला मोबाईल आणि पुस्तक यामधील समन्वय साधने आव्हानच. त्यामुळे राज्यभरातील सर्व ग्रंथपालांना डिजिटल क्रांतीच्या या युगामध्ये मोबाईल आणि पुस्तक याचा योग्य तो समन्वय साधून विद्यार्थ्यांना योग्य ती दिशा देण्याकरिता ग्रंथपालांकरिता सुद्धा फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम (FDP) चे करिअर कट्टा उपक्रम अंतर्गत आयोजन करण्यात येत आहे.

* वरील तिन्ही निःशुल्क ऑनलाइन पद्धतीने घेण्यात येणारे फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम (FDP) असून यामध्ये फक्त किरकोळ अशी २०० रुपये परीक्षा रक्कम आकारली जाते.

### ४] मधुमक्षिकापालन

खादी व ग्रामोद्योग मंडळ महाराष्ट्र शासन यांच्या सहकार्याने राज्यातील १०० हून अधिक महाविद्यालयामध्ये प्रत्येकी ५० मधूमक्षिका पालनासाठीच्या पेट्या असणारे मधकेंद्र मधुर क्रांती अंतर्गत तयार केले जाणार आहे. यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार सहा दिवसाचा 'फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम' घेण्यात येणार असून या माध्यमातून ज्या ठिकाणी मधुमक्षिका पालन या व्यवसायासाठी पोषक वातावरण आहे अशा १०० हून अधिक तालुक्यांमधील महाविद्यालयांची निवड करून आणि प्राध्यापक यांना प्रशिक्षण देऊन, विद्यार्थी रोजगाराभिमुख होण्याकरिता प्रतिवर्षी किमान ३०००० तरुणांना 'मधुर क्रांती' या उपक्रमांतर्गत प्रशिक्षण देण्याचे ठरविलेले आहे. हा निवासी निःशुल्क असा कार्यक्रम आहे.

### ५] कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) : शिक्षक

राज्यस्तरीय बैठकीमधी ठरल्याप्रमाणे करिअर संसदेचे राज्यस्तरीय अधिवेशन ३ जानेवारी ते ७ जानेवारी या कालावधीमध्ये बारामती येथे पाच दिवसांसाठी आयोजित करण्याचे नियोजित असून. यामध्ये विद्यार्थ्यांसोबत आलेल्या प्राध्यापक वर्ग यांच्याकरिता निवासी पाच दिवसीय फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम हा कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) या सध्य स्थितीत प्रचलित आणि आवश्यक विषयावर घेण्याचे नियोजित आहे. सदर फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम हा निःशुल्क प्रकारचा असून सर्वानी यामध्ये सहभाग घ्यावा.

**प्रा. ममता पळसपगार**
राजर्षी शाहु सायन्स कॉलेज, चांदुर रेल्वे,
जिल्हा समन्वयक अमरावती (ग्रामीण)

# आवाजाची कार्यशाळा

महाराष्ट्र राज्य उच्च आणि तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्यामार्फत काही वर्षापासून 'करिअर कट्टा' हा अत्यंत यशस्वी उपक्रम सुरू आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी या माध्यमातून उत्तमोत्तम संधी विद्यार्थ्यांना मिळवून दिल्या जात आहेत. याच उपक्रमाचा एक भाग म्हणून 'कोविड काळापासूनच' आपण 'आवाज गुरुजनांचा वेध देशाच्या भवितव्याचा' हा विषय शिक्षकांसाठी आवाजाच्या कार्यशाळेत घेण्याबाबतचा उपक्रम प्रस्ताव तत्कालीन उच्च व तंत्र शिक्षण मंत्री मा. उदय सामंत यांच्यासमोर मांडला. या विषयाचं गांभीर्य आणि आवश्यकता समजून घेतल्यानंतर त्यांनी सर्वतोपरी सहाय्य करण्याचं आश्वासन दिले आणि एक नव्या अध्यायाची सुरुवात महाराष्ट्रात झाली.
कोविड काळात उच्च व तंत्र शिक्षण विभागाअंतर्गत महाविद्यालयीन प्राध्यापकांसाठी या कार्यशाळा ऑनलाईन पद्धतीने घेण्यास सुरुवात केली. कोविडचा भर ओसरल्यानंतर प्राध्यापकांकडून या कार्यशाळा प्रत्यक्ष महाविद्यालयात घडवून आणण्याबाबत विचारणा करण्यात आली. त्यानुसार सुरुवातीला विभागीय स्तरावर महाराष्ट्रभर या कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले आणि ठराविक शिक्षक प्रतिनिधींना याचा लाभ घेता आला. याच प्रतिनिधींनी जिल्हा स्तरावर आता कार्यशाळा घेण्यात याव्यात ही मागणी केली आणि त्याप्रमाणे दर महिन्याला दोन ते तीन जिल्हे याप्रमाणे गेल्या एका वर्षात महाराष्ट्रातील २८ जिल्ह्यात एकूण ३० कार्यशाळा घेण्यात आल्या. इतक्या मोठ्या स्तरावर हा अतिशय अभिनव असा उपक्रम राबवणारे महाराष्ट्र हे भारतातील पहिले राज्य ठरले आहे, याचा आम्हा सर्वांना सार्थ अभिमान आणि आनंद आहे, पण ही केवळ सुरुवात आहे. ही मदत महाराष्ट्रातल्या प्रत्येक शिक्षकापर्यंत पोहोचली पाहिजे हे उद्दिष्ट आहे. या प्रवासात शिक्षकांशी, प्राचार्य वर्गाशी संवाद साधता आला त्यांच्या मूलभूत समस्यांचा आढावा घेता आला. करिअर कट्टाच्या जिल्हास्तरीय संसदेची कौतुकास्पद कामगिरी प्रत्येक जिल्ह्यात ठळकपणे नजरेत भरली. एक अतिशय शिस्तबद्ध आणि नजरेसमोरील उद्दिष्टांप्रती एकाग्रहित अशी तरुण विद्यार्थ्यांची पिढी या निमित्ताने घडवली जात आहे, याचं अत्यंत कौतुक वाटलं.
'शिक्षकांसाठी आवाजाच्या कार्यशाळा' हा आता केवळ उपक्रम न राहता एक चळवळीचं माध्यम बनावं ही अपेक्षा आहे. मनुष्याचा आवाज हे त्याच्या स्वास्थ्याचे बॅरोमीटर आहे आणि शारीरिक स्वास्थ्याचा मानसिक स्वास्थाशी जवळचा संबंध असतो, हे सुद्धा सर्वश्रुत आहेच.
विकसित देशात शिक्षण क्षेत्रात याबाबत जितकी सावधानता बाळगली जाते तितकीच आपल्याकडेही बाळगली जावी, हे स्वप्न आम्ही पाहतो आहे. उत्तम आवाजाचा फायदा हा शिक्षकांना होतोच पण त्याचबरोबर त्याचा फायदा विद्यार्थ्यांना होऊन एकूणच कार्यक्षमता, उत्पादकता वाढणे हे सुद्धा घडते. या कार्यशाळांचा लाभ घेतलेल्या शिक्षक वर्गांच्या प्रतिक्रिया या अत्यंत उत्साहवर्धक आहेत.
कोणतीही नवीन संकल्पना किंवा विचार हा समाजात रुजवणे हे अर्थातच अवघड कार्य असते. 'आवाजाचे स्वास्थ्य आणि योग्य वापर' हा विषय महाराष्ट्रातल्या प्रत्येक शिक्षकांपर्यंत पोहोचवणे, त्याबाबत त्यांना शक्य ते होईल तेवढी मदत करणे हे म्हणूनच एक शिवधनुष्य पेलण्या इतकेच अवघड काम आहे. या कार्यात सर्वतोपरी सहाय्य करणाऱ्या महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्राचे आणि 'करिअर कट्टा' उपक्रमाशी संबंधित प्रत्येक व्यक्तीचे मनापासून आभार!

**मा. सोनाली लोहार**
सदस्य, सल्लागार मंडळ, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र

# ॲड ऑन कोर्स वेळापत्रक

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये अपेक्षित असणारे पदवीच्या प्रथम वर्षासाठी
सर्व विद्यार्थ्यांसाठी आवश्यक असणारे कोर्सेस

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | VEC | Indian constitution | 2 Credits |
| | | Environmental studies | |
| 2 | AEC | German Language | 2 Credits |
| | | Russian Language | |
| | | Arabic Language | |
| | | Spanish Language | |
| | | French Language | |
| | | Japanese Language | |
| 3 | VSC | Communication skill development | 2 Credits |
| | | Writing skill in English | |
| | | Business communication | |
| | | Personality development | |
| | | Writing skill in Marathi | |
| 4 | IKS | Generic Indian knowledge system | 2 Credits |
| 5 | CC | NSS | 2 Credits |
| | | Cultural | |
| | | Sports | |
| | | NCC | |
| 6 | GE/OE | Digital marketing | 2 Credits |
| 7 | GE/OE | Event management | 2 Credits |
| 8 | GE/OE | Basic concepts of accounting | 2 Credits |
| 9 | GE/OE | Emotional intelligence | 2 Credits |
| 10 | GE/OE | Time and stress management | 2 Credits |
| 11 | GE/OE | Financial literacy | 2 Credits |
| 12 | GE/OE | Personality development for overseas placement | 2 Credits |

# करिअर संसद

करिअर कट्टा या उपक्रमामध्ये महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची रुची व सहभाग वाढावा तसेच त्यांच्या करिअरविषयी दृष्टिकोनामध्ये जास्तीत जास्त स्पष्टता यावी या उद्देशाने प्रत्येक महाविद्यालयांमध्ये कमीत कमी नऊ विद्यार्थ्यांचा सहभाग असणारी करिअर संसद बनवण्यात यावी त्याची नियमावली पुढील प्रमाणेः

१. पदवीच्या दुसया वर्षामध्ये सहभागी असणाऱ्या किंवा त्यापुढील कोणत्याही वर्गातील विद्यार्थ्यांचा समावेश करिअर संसद मध्ये करण्यात यावा.
२. किमान ५०% जागांवर मुलींची निवड करण्यात यावी.
३. कमीत कमी नऊ विद्यार्थी करिअर संसद मध्ये असतील.
४. करिअर संसदेमधील विद्यार्थ्यांचा कालावधी एक वर्षाचा असेल
५. प्रतिवर्षी १५ जुलै जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या करिअर संसदेचा स्थापना दिवस असेल.
६. करिअर संसदेमध्ये पुढील प्रमाणे पदांचा समावेश असेल.

१ मुख्यमंत्री
२ नियोजन मंत्री
३ कायदे व शिस्त पालन मंत्री
४ सामान्य प्रशासन मंत्री
५ महिती व प्रसारण मंत्री
६ उद्योजकता विकास मंत्री
७ रोजगार स्वयंरोजगार मंत्री
८ कौशल्य विकास मंत्री
९ संसदीय कामकाज मंत्री
१० महिला व बालकल्याण मंत्री
११ सदस्य

अधिक माहितीसाठी मार्गदर्शन पुस्तिका पहावी

# करिअर संसदेचे अधिवेशन

करिअर संसदेचे विभागीय अधिवेशन हे त्या विद्यापीठातील कार्यक्षेत्रामध्ये असणाऱ्या महाविद्यालयांमधील करिअर संसदेचे सर्व पदाधिकारी एकत्र येऊन एक दिवसाचे विभागीय अधिवेशन आयोजित केले जाईल. यामध्ये उद्योजकता विकास, स्पर्धा परीक्षा, व्यक्तिमत्व विकास, करिअरच्या वेगवेगळ्या संधी या विषयावर मार्गदर्शन, चर्चासत्र आणि स्पर्धांचे आयोजन केले जाईल.

करिअर संसदेचे राज्यस्तरीय अधिवेशन ३ जानेवारी ते ७ जानेवारी या कालावधीमध्ये बारामती येथे पाच दिवसांसाठी आयोजित केले जाईल. यामध्ये आर्टिफिशियल ॲग्रो अंतर्गत कृषी, पर्सनॅलिटी डेव्हलपमेंट, यूपीएससी, एमपीएससी, स्टार्टअप इकोसिस्टम याविषयीचे प्रशिक्षण व हँड्सऑन ट्रेनिंग विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिले जाईल.

दर रविवारी सकाळी दहा वाजता करिअर संसदेच्या पदाधिकाऱ्यांची राज्यस्तरीय बैठक आणि प्रशिक्षण आयोजित केलेले असेल.

करिअर संसदेच्या पदाधिकाऱ्यांना दर महिन्याला महाविद्यालयामध्ये करिअर कट्टाच्या दिनदर्शिकेनुसार विशेष उपक्रम राबवायचे आहेत.

करिअर कट्टाच्या करिअर संसदेने महाविद्यालयामध्ये उपक्रम राबवण्याबरोबरच प्रति महिना एका अधिकारी तसेच उद्योजक यांची प्रत्यक्ष मुलाखत घेऊन त्याचा अहवाल सादर करावयाचा आहे.

प्रत्येक करिअर संसदेतील विद्यार्थ्यांनी करिअर डायरी तंतोतंत कृतीत उतरवयाची आहे आणि त्याची योग्य ती अंमलबजावणी करायची आहे.

# मॉडेल कौशल्य विकास केंद्र

करिअर कट्टा या उपक्रमांतर्गत महाविद्यालयांच्या सहकाऱ्यांनी तसेच खाजगी आस्थापना व संस्थांच्या मदतीने त्रिपक्षीय सामंजस्य कराराद्वारे कौशल्य विकास केंद्राची स्थापना केली जाणार आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार सुसज्ज असे कौशल्य विकास केंद्र उभे करून, जिल्हा नियोजन समिती, राज्य शासन व केंद्र शासन तसेच विविध महामंडळाच्या असणाऱ्या प्रशिक्षण योजनांचा लाभ महाविद्यालयांमध्ये शिकणारे विद्यार्थी तसेच पासआऊट व ड्रॉप आउट विद्यार्थी यांना द्यावा आणि या माध्यमातून विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयन केले जात आहेत.

महाविद्यालयाची उपलब्ध असणारी साधनसामग्री व भौगोलिक गरज याचा विचार करून अभ्यासक्रमाची निवड केली जाईल. या उपक्रमांतर्गत विद्यार्थी नोंदणी करून शासकीय योजनेच्या नियम व अटींची पूर्तता करण्याची जबाबदारी महाविद्यालयाची असणार आहे. सदर कौशल्य विकास केंद्र मंजूर करून घेत असताना केंद्र शासनाने ठरवल्याप्रमाणे विहित नमुन्यातील केंद्र तपासणी शुल्क व कोर्स मंजुरीसाठीचे शुल्क महाविद्यालयाला भरावे लागणार आहे आणि महाविद्यालयास प्रति विद्यार्थी प्रति तास शिकवण्यासाठी करार ठरवल्याप्रमाणे मानधन उपलब्ध करून दिले जाणार आहे.

या उपक्रमांतर्गत केंद्र शासनाच्या कौशल्य विकास योजनेअंतर्गत वेळोवेळी उपलब्ध असणारे अभ्यासक्रम शासनाच्या नियम व अटींच्या पूर्तता करून राबविण्यात येतील.

## मॉडेल स्किल डेव्हलपमेंट सेंटर



# सेंटर ऑफ एक्सलन्स

## पार्श्वभूमी :

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने सुरु असणाऱ्या करिअर कट्टा या उपक्रमांतर्गत युवकांच्या करिअरला योग्य दिशा देण्याच्या उद्देशाने राज्यातल्या निवडक महाविद्यालयांमध्ये **Center Of Excellence** उभे केले जाणार आहे. यामागील महत्वाची भूमिका अशी की, राज्यांमध्ये स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी मोठ्या प्रमाणात मुले शहरी भागांमध्ये स्थलांतरित होत असतात. जीवनातील उमेदीच्या काळातील अनेक वर्ष किंवा स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी घरापासून, गावापासून, पालकांपासून लांब राहणाऱ्या मुलांमध्ये मोठ्या प्रमाणात नैराश्याचे वातावरण तयार होते याचे प्रमाण राज्यामध्ये लाखोंच्या घरात आहे. खाजगी प्रशिक्षण संस्थांचे उद्देश वेगवेगळे असल्यामुळे सरसकट सर्व मुलांना प्रोत्साहन देऊन यामध्ये गुंतवून ठेवण्याचा एक प्रयन होत असतो आणि मोठ्या प्रमाणात ग्रामीण पालक व विद्यार्थी या दृष्टचक्रात अडकतात. स्पर्धा परीक्षेचे नियोजन करत असताना स्वतःच्या करिअरसाठी एक प्लॅन बी देखील तितका सक्षमपणे तयार ठेवला पाहिजे आणि एका योग्य वयानंतर करिअर चा मार्ग बदलून योग्य निर्णय घेतला पाहिजे, याचे मार्गदर्शन देण्याची यंत्रणा उभे करणे हा **Center Of Excellence** स्थापनेमागील महत्त्वाचा उद्देश आहे.

## संकल्पना :

महाराष्ट्र राज्य शासनाकडन सूध्या राज्यभरामध्ये सहा ठिकाणी **Pre IAS Training** सेंटरच्या माध्यमातून ७४० विद्यार्थ्यांच्या निवासी प्रशिक्षणाची यंत्रणा अस्तित्वात आहे. करिअर कट्ट्याच्या माध्यमातून राज्यभरामध्ये १०,००० विद्यार्थ्यांच्या स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी व्यवस्था निर्माण करणे तसेच राज्यातील महाविद्यालयांमध्ये उद्योजकीय संस्कार घडावेत व उद्योग व्यवसाय निर्माण करणारी युवा पिडी पुढे यावी, या उद्देशाने ५००० युवा उद्योजकांना महाविद्यालयीन स्तरावर उद्योजकीय विकासासाठी आवश्यक कार्यालयीन व्यवस्था उपलब्ध करुन देण्यात येईल. **Center Of Excellence** च्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे शहरातील स्थलांतर कमी करण्याचा तसेच नगण्य शुल्क आकारून विद्यार्थी आणि पालकांना स्थानिक पातळीवर राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील तज्ज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शक उपलब्ध करून देण्याचा मानस आहे. विद्यार्थी व पालकांसाठी तज्ज्ञांकडून समुपदेशन केले जाईल. उद्योग क्षेत्रामध्ये तसेच व्यावसायिक क्षेत्रांमध्ये ज्यांनी आपल कर्तृत्व सिद्ध केलं आहे, अशा कर्तृत्वसंपन्न व्यक्तींच्या मार्गदर्शनाखाली, नियंत्रणाखाली **Center Of Excellence** कार्यरत राहील.

# सेंटर ऑफ एक्सलन्स

## स्पर्धा परीक्षा पूर्वतयारी व अभ्यासिका

महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांचे MPSC परीक्षेसाठी तयारीचे प्रमाण व केंद्र शासनाच्या वेगवेगळ्या नोकऱ्यांसाठी असणारे प्रमाण बघता महाराष्ट्रीयन विद्यार्थी तुलनात्मक दृष्ट्या केंद्र शासनाच्या नोकरीमध्ये कमी प्रमाणात तयारी करत असल्याचे लक्षात येते. यासाठी याची माहिती विद्यार्थ्यांना योग्य वेळी झाली पाहिजे. त्यांच्या तयारीसाठी अभ्यास वर्ग व प्रशिक्षण उपलब्ध आले पाहिजे तसेच हे सर्व करताना त्यांच्या राहत्या ठिकाणापासून शक्य तितक्याजवळ या गोष्टी उपलब्ध होतील, यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. जास्त विद्यार्थी संख्या असणाऱ्या महाविद्यालयांमध्ये शंभर विद्यार्थ्यांची अभ्यासिका जी पूर्णवेळ विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असेल सदर अभ्यासिकेमध्ये ऑनलाईन लेक्चर सुविधा असेल ज्यामध्ये केंद्रीय पद्धतीने संपूर्ण राज्यात एकाच वेळेला सर्व प्रशिक्षण केंद्रामध्ये तज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन उपलब्ध करून दिले जाईल. आवश्यकता भासल्यास दिल्ली, मुंबई, पुणे या ठिकाणच्या तज्ज्ञ अनुभवी प्रशिक्षण प्रशिक्षकांची नियुक्ती देखील करण्यात येईल.

'Center Of Excellence' या प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सदर प्रक्रियेसाठी निघालेल्या जाहिरातीची माहिती देणे, योग्य पद्धतीने कागदपत्रांची पूर्तता करून घेणे, त्यांचे फॉर्म भरणे आणि परीक्षेची पूर्वतयारी करून घेणे तसेच ज्या ज्या ठिकाणी आवश्यकता आहे त्या ठिकाणी तज्ज्ञ व्यक्तींकूडन मुलाखतीची तयारी करून घेणे या पद्धतीने उपक्रम राबवले जातील. वेगवेगळ्या परीक्षांचे फॉर्म भरण्यासाठी विद्यार्थ्यांसाठी सुविधा केंद्र उपलब्ध असेल. विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन समुपदेशनासाठी सोय असेल विद्यार्थी व पालकांची मागणी असल्यास समुपदेशनासाठी स्वतंत्र सेशनचे नियोजन करण्यात येईल. विद्यार्थ्यांच्या बौद्धिक व शारीरिक क्षमतेचा विचार करता त्यांना स्पर्धा परीक्षा ऐवजी अन्य क्षेत्रामध्ये उत्कृष्ट कामगिरी करणे शक्य असल्यास याबाबत देखील मार्गदर्शन केले जाईल.

## गुणवत्ता व नियंत्रण

१. 1000 पेक्षा विद्यार्थी संख्या जास्त विद्यार्थी संख्या असलेल्या महाविद्यालयांमध्ये तसेच ज्या परिसरामध्ये १५०० पेक्षा जास्त विद्यार्थी पदवीच्या पहिल्या वर्षाला असतील त्या परिसरामध्ये 'Center Of Excellence' उभारण्यात येत आहे.

२. या सेंटरमध्ये १०० विद्यार्थी एकाच वेळेला अभ्यास करु शकतील, अशी अभ्यासिकेची रचना करण्यात येईल. त्यासाठी लागणारे बॅचेस, लेक्चरसाठीचे Interactive Board उपलब्ध असतील.

३. त्याचप्रमाणे Common Faculty Centre असेल ज्यामध्ये Computer उपलब्ध करून विद्यार्थ्यांसाठी आपली कागदपत्र स्कॅन करणे, परीक्षेचे फॉर्म भरणे, हॉल तिकीट Generate करणे, प्रिंट काढणे असतील.

४. त्याचप्रमाणे SSC/UPSC/MPSC या सर्व स्पर्धा परीक्षेची प्रशिक्षण चालतील व इतर वेळेला विद्यार्थी अभ्यासिकेत बसून स्वयं अध्ययन करतील.

५. अभ्यासिका सकाळी ६.00 ते संध्याकाळी ८.00 वाजेपर्यंत चालू असेल. यामध्ये संध्याकाळी ५.00 ते ८.00 online प्रशिक्षण असेल.

६. अभ्यासिकेचा मासिक खर्च निघावा यासाठी अग्रणी महाविद्यालय काही शुल्क आकारू शकतील, पण या माध्यमातून शुल्क ठरवत असताना क्लस्टर मध्ये येणाऱ्या महाविद्यालयाचे प्राचार्य व समन्वयक यांच्याशी सल्ला मसलत करून ठरवावे.

७. या सेंटरमध्ये विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर जसा फोकस असेल त्याचप्रमाणे त्या विद्यार्थ्यांच्या मानसिकतेकडेही लक्ष देण्यात येईल, यासाठी विद्यार्थ्यांची Psychology Test घेण्यात येईल. यातून तो विद्यार्थी कोणत्या स्पर्धा परीक्षेसाठी तयार आहे हे कळेल. ऑनलाईन समुपदेशनाच्या माध्यमातून पालकांना आणि विद्यार्थ्यांना समुपदेशन करण्यात येईल. परते, कोणालाही वैयक्तिक समुपदेशन हवे असल्यास पालकांच्या मागणीप्रमाणे वैयक्तिक समुपदेशन ही करण्यात येईल.

## उद्योजकता विकास केंद्र

राज्यात सद्यस्थितीला उद्योजकीय कौशल्य वाढीसाठी आवश्यक अशी व्यवस्था अस्तित्वात नाही. Entrepreneurshpi Development Cell, Incubation center हे प्रत्येक महाविद्यालयामध्ये असावे असा राज्य व केंद्र शासनाच्या धोरणांमध्ये झालेला बदल विचार घेता महाविद्यालयीन व्यवस्थापन, प्राचार्य, प्राध्यापक यांच्यापर्यंत हा विचार प्रभावीपणे पोहोचवणे आणि उद्योग क्षेत्रातील यशस्वी उद्योजकांच्या, संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या व बँक प्रशासनाच्या माध्यमातून महाविद्यालयीन स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी योग्य ते मार्गदर्शन उपलब्ध करून देणे, त्यांच्या उद्योजकीय विकासाला चालना देणे या उद्देशाने महाविद्यालयीन स्तरावर प्रत्येक सेंटरमध्ये ५० विद्यार्थ्यांच्या Student-Startup कामकाजासाठी कार्यालयीन व्यवस्था उपलब्ध करणे हा 'Center Of Excellence' चा महत्त्वाचा उद्देश आहे.

विद्यार्थ्यांच्या उद्योजकीय संकल्पनांना विस्तारण्यासाठी आवश्यक असणाऱ्या व्यावसायिक सल्लागार व्यक्तींची उपलब्धता विद्यार्थ्यांना करून देणे, राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय पातळीवर चालणाऱ्या उद्योजकीय बदलांविषयी, तंत्रज्ञानांविषयी आणि कायदा विषयी त्यांना वेळोवेळी माहिती उपलब्ध करून देणे, विद्यार्थी आणि उद्योजक यांचा सातत्याने संवाद आयोजित करून त्या माध्यमातून उद्योग जगतातील घडामोडी विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवत असतानाच त्यांना सविस्तर मार्गदर्शन करण्यासाठी 'Center Of Excellence' कार्यरत आहे. विद्यार्थ्यांच्या राजकीय नेतृत्वाचा विकासासाठी विद्यार्थी संसद त्याच पद्धतीने उद्योजकीय नेतृत्व विकासासाठी प्रत्येक सेंटरमध्ये "Student Startup-company" नोंदणीकृत असेल आणि विद्यार्थी संसदेमध्ये मंत्रिमंडळाप्रमाणेच या कंपनीमधील व्यवस्थापकीय प्रमुख, आर्थिक व्यवस्थापक प्रमुख, या पद्धतीच्या वेगवेगळ्या पदांवर काम करण्याचा अनुभव विद्यार्थ्यांना यावा, यासाठी Student Startup ला गती देण्यात येईल.

## उद्देश

१. जे विद्यार्थी स्पर्धा परीक्षा पास होऊ शकत नाही त्या विद्यार्थ्यांसाठी या सेंटरमध्ये उद्योजकता विकास हा उपक्रम राबवण्यात येईल.

२. यामध्ये ५० विद्यार्थ्यांना ऑफिस चालवण्यासाठी लागणारे सेटअप उपलब्ध करून देण्यात येईल. यामध्ये Conference Room, Desk व इतर सुविधा महाविद्यालयाकूडन उपलब्ध करुन दिल्या जातील.

३. एक वर्ष हे विद्यार्थी Student Startup म्हणून काम करतील. या विद्यार्थ्यांपैकी महाविद्यालयाबरोबर नोंदणी करून स्टार्टअप चालू करणार असतील त्यांना रु. १,००,०००/– देण्यात येतील.

४. महाविद्यालयाला लागणाऱ्या सुविधा उपलब्ध करणे, ग्रामीण भागातील वस्तु शहरी भागात उपलब्ध करून देणे, शहरी भागातील वस्तू ग्रामीण भागात उपलब्ध करुन देणे या प्रक्रियेमुळे एक Inter connected Hub निर्माण होऊ शकते व यातूनच विद्यार्थी उद्योग कसा करावा, हे समजू शकतील.

५. यामध्ये जे विद्यार्थी प्रत्यक्ष कार्यानुभव घेतील त्यांना अनुभव प्रमाणपत्र देण्यात येईल.

६. यामध्ये विद्यार्थी Branding, Packaging, Logo Making, Service Provider Model, IPR Formalities, Time Management, Decision Making या सर्व गोष्टी शिकतील.

## गुणवत्ता व नियंत्रण

१. या सगळ्या प्रक्रियेवर नियंत्रण ठेवण्यासाठी त्या भागातील प्रसिद्ध उद्योजक सल्लागार मंडळावर कार्यरत असतील.

२. विद्यार्थ्यांसाठी आठवड्यातून एकदा मार्गदर्शन करण्यात येईल. ज्यामध्ये

| | |
|---|---|
| – पहिला आठवडा | – बँकेचे अधिकारी बँकेचा योजना, |
| – दुसरा आठवडा | – जिल्ह्यातील उद्योग केंद्राचे अधिकारी मार्गदर्शन, शासकीय योजना, |
| – तिसरा आठवडा | – प्रायव्हेट कन्सल्टंट यांचे मार्गदर्शन, |
| – चौथा आठवडा | – आंतरराष्ट्रीय उद्योजक ऑनलाईन मार्गदर्शन करतील. |

## नियामक मंडळ

**नियम व अटी**

१. क्लस्टरमध्ये सहभागी असणाऱ्या सर्व महाविद्यालयातील पदवीच्या प्रथम वर्षाला प्रवेश घेणारे सर्व विद्यार्थी करिअर कट्टाला नोंदणी करणे आवश्यक आहे, याची जबाबदारी अग्रणी महाविद्यालयाच्या समन्वयकांची असेल.

२. Center of excellence चे निर्णय घेत असताना क्लस्टरमध्ये सहभागी असणाऱ्या महाविद्यालयाचे प्राचार्य व समन्वयक तसेच अग्रणी महाविद्यालयाचे प्राचार्य व समन्वयक, त्या जिल्ह्याचे प्राचार्य प्रवर्तक, जिल्हा समन्यवक, त्या भागातील एक यशस्वी उद्योजक, निवृत्त प्रशासकीय अधिकारी व विद्यार्थी प्रतिनिधी या सर्वांचा समावेश असलेल्या स्थानिक नियामक मंडळाच्या बैठकीत संगनमताने घेण्यात यावे.

१. प्राचार्य प्रवर्तक
२. जिल्हा समन्वयक
३. क्लस्टर मधील सहभागी महाविद्यालयाचे प्राचार्य
४. क्लस्टर मधील सहभागी महाविद्यालयाचे समन्वयक
५. अग्रणी महाविद्यालयाचे प्राचार्य
६. अग्रणी महाविद्यालयाचे समन्वयक
७. यशस्वी उद्योजक
८. निवृत्त प्रशासकीय अधिकारी
९. विद्यार्थी प्रतिनिधी

३. करिअर कट्टा अंतर्गत Center of excellence चालवत असताना १०० विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका उभी करण्यासाठी जो रु. १०,००,०००/– निधी दिला जाणार आहे त्याची वितरण नियमावली पुढील प्रमाणे :

– प्रतिवर्षी २०% (रु. २,००,०००) या पद्धतीने निधी वितरण होईल.

– पुस्तके, फर्निचर, डिजिटल साधनसामग्री, (Interactive Board/Sound System) याचा प्राधान्यक्रम ठरवण्याचा अधिकार महाविद्यालयाचा असेल.

– निधी वितरित करीत असताना क्लस्टरमध्ये असलेल्या करिअर कट्टामधील सहभागी असणाऱ्या विद्यार्थी संख्येवर निधी वितरणाचे गुणोत्तर अवलंबून असेल.

४. करिअर कट्टाकडून केंद्रीय पद्धतीने वस्तू खरेदी करून महाविद्यालयास वितरित केल्या जातील, यासाठी करिअर कट्टाने स्थापन केलेली खरेदी समिती निर्णय घेईल.

५. Center of excellence साठी दिलेली जागा (अभ्यासिका/incubation center) ही पूर्ण वेळ त्याच उद्देशासाठी वापरली जाणे आवश्यक आहे.

६. ५०% जागा या अग्रणी महाविद्यातील विद्यार्थ्यांसाठी असतील तर २०% जागा या पासआऊट विद्यार्थ्यांसाठी आणि ३०% जागा आजूबाजूच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी असतील.

७. Center of excellence अंतर्गत स्थापन करण्यात येणाऱ्या incubation center साठी क्लस्टर मधून नियमक मंडळाने १५ विद्यार्थ्यांची निवड student startup कंपनीचे पदाधिकारी म्हणून करावी.

८. Incubation Center चे पदाधिकारी म्हणून निवडलेल्या विद्यार्थ्यांना नियोजन व्यवसायाची निवड करण्यासाठी नियमक मंडळ व निवडलेले पदाधिकारी यांना वेगवेगळ्या संकल्पनांचे सादरीकरण घेऊन त्यामधून एका व्यवसायाची निवड करावी.

९. सदर निधीमधील १५% भाग हा व्यवस्थापकीय खर्चावर खर्च करता येईल उर्वरित ८५ % भाग हा व्यवसायाचे मुख्य उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी वापरला जाणे आवश्यक आहे.

१०. सदर व्यवसाय करत असताना महाविद्यालय व करिअर कट्टा यांच्या आर्थिक जबाबदारी उपलब्ध करुन दिलेल्या भांडवला इतकीच मर्यादित राहील. या व्यतिरिक्त कोणत्याही पद्धतीची आर्थिक जबाबदारी / दायित्व व्यवसायातून पदाधिकाऱ्यांनी निर्माण केले असता त्याची जबाबदारी त्यांची वैयक्तिक राहील.

११. Center of excellence अंतर्गत येणाऱ्या Incubation center ला नियामक मंडळांने मान्यता दिलेल्या व्यवसायासाठी कोणतेही पद्धतीचे कर्ज घेता येणार नाही.

१२. महाविद्यालयाच्या आवारामध्ये व्यवसाय करत असताना त्या व्यवसायाचा कोणत्याही पद्धतीचा त्रास महाविद्यालयाच्या नियमित कामकाजावर होणार नाही याची दक्षता पदाधिकाऱ्यांनी घ्यावयाचे आहे तसेच सदर व्यवसाय करत असताना कोणत्याही समाज विघातक गोष्टींना प्रोत्साहन मिळेल अशा बाबींचा समावेश व्यवयामध्ये असू नये.

१३. मागील वर्षी दिलेल्या निधी वापरून केलेल्या व्यवसायातून काही नफा निवडलेल्या पदाधिकाऱ्यांनी मिळवला असल्यास त्याचे वितरण तीन समान भागांमध्ये करण्यात येईल यामध्ये विद्यार्थी पदाधिकारी, करिअर कट्टा व महाविद्यालयांचा समावेश असेल.

१४. सदर निधी वापरुन केलेल्या व्यवसायामध्ये १००% तोटा झाल्यास कोणत्या पद्धतीची वसुली विद्यार्थी पदाधिकारी किंवा महाविद्यालयांच्याकडून केली जाणार नाही, तसेच पुढच्या वर्षी दिल्या जाणाऱ्या निधिवर त्याचा कोणताही नकारात्मक परिणाम होणार नाही.

१५. महाविद्यालयाच्या प्रयत्नांमुळे विद्यार्थ्यांनी केलेल्या व्यवसायामध्ये नफ्यातील करिअर कट्टाला मिळालेला नफ्याच्या हिश्यातील ५०% रक्कम पुढील वर्षी दिल्या जाणाऱ्या रु. १,००,०००/- निधीमध्ये वाढवून दिली जातील.

१६. सदर व्यवसाय करत असताना विद्यार्थ्यांना व्यवसायासाठी आवश्यक कायदेशीर बाबी, बाजारपेठेची माहिती तसेच आर्थिक व्यवहार करत असताना घ्यावयाची काळजी याविषयी त्यांना सुरुवातीलाच प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करण्यात येईल.

१७. REVENUE Generate झाल्यावर त्यातील काही भाग अग्रणी महाविद्यालयात असेल.

१८. CSR/उद्योग मंत्रालय/Skill Development याचा Additional Fund महाविद्यालयाला उपलब्ध करून देण्याचा असेल.

१९. महाविद्यालयाच्या प्राधान्याप्रमाणे त्यांच्या सभा घेऊन, त्यांची गरज पाहून सेंटर चालू करण्यासाठी लागणारी उपकरणे उपलब्ध करून दिली जातील.

# आर्थिक साक्षरता कार्यशाळा




महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'करिअर कट्टा' या उपक्रमांतर्गत आर्थिक साक्षरतेविषयी कार्यशाळांचे आयोजन भारतीय प्रतिभूती व विनिमय मंडळ **(SEBI)**, नॅशनल स्टॉक एक्सचेंज **(NSE)**, बॉम्बे स्टॉक एक्सचेंज **(BSE)** आणि नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सिक्युरिटीज मार्केट्स **(NISM)** यांच्या सहकार्याने केले जाते. संपूर्ण महाराष्ट्रभरात ह्या कार्यशाळा अनेक महाविद्यालयातील कर्मचारी व विद्यार्थ्यांसाठी आयोजित केल्या जात असतात.

आर्थिक साक्षरता म्हणजे व्यक्तींना त्यांच्या आर्थिक निर्णयांबाबत योग्य माहिती व समज देणे. विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्याच्या काळातच योग्य आर्थिक ज्ञान दिल्यास ते भविष्यात आर्थिकदृष्ट्या सुदृढ बनू शकतात. कर्मचाऱ्यांसाठी अशा कार्यशाळा त्यांच्या उत्पन्नाचे योग्य नियोजन, गुंतवणूक, कर नियोजन व निवृत्तीच्या तयारीस मदत करतात.

**SEBI, NSE, BSE** आणि **NISM** सारख्या संस्थांकडून प्रमाणित तज्ज्ञ या कार्यशाळांमध्ये मार्गदर्शन करतात. यात शेअर बाजाराची माहिती, म्युच्युअल फंड गुंतवणूक, डिजिटल बँकिंग, फसवणुकीपासून संरक्षण यावर भर दिला जातो.

विद्यार्थ्यांमध्ये लवकर वयातच आर्थिक शिस्त लागावी, डिजिटल व्यवहारांची माहिती असावी आणि त्यांच्या उद्याच्या आर्थिक निर्णयांमध्ये सजगता यावी, यासाठी ही कार्यशाळा अत्यंत उपयुक्त ठरते. कर्मचाऱ्यांसाठीही हाच ज्ञानाचा उपयोग त्यांच्या आर्थिक साक्षरतेत वृद्धी घडवतो.

सरकारी धोरणांनुसारही आर्थिक समावेशनाला चालना देण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता आहे. हे उपक्रम लोकांना आत्मनिर्भर बनवून देशाच्या आर्थिक विकासातही महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात.

करिअर कट्टा या उपक्रमांतर्गत सहभागी सर्व महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्यामधील आर्थिक साक्षरता वृद्धिंगत व्हावी या उद्देशाने आर्थिक साक्षरता अभियान राबविण्यात येते. त्यामध्ये सुसूत्रता यावी, उत्कृष्ट पद्धतीचे नियोजन व्हावे यासाठी राज्यस्तरीय समितीचे गठन करण्यात आले आहे. या उपक्रमांतर्गत कार्यशाळा राबवण्यासाठी तज्ज्ञ मार्गदर्शक तसेच ठरवून दिल्याप्रमाणे महाविद्यालयास प्रतिकार्यशाळा तीन हजार रुपये मानधन दिले जाते.

# अक्षय्या नारी शक्ती संघ

अक्षय्या
नारी शक्ती संघ

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयीन युवतींमध्ये आर्थिक स्वयंशिस्त लागावी व त्यांची Sustainable Credibility Enhance व्हावी, या उद्देशाने तीन वर्षासाठीचा नियोजनबद्ध उपक्रम

**प्रस्तावना :**

''थेंबे थेंबे तळे साचे'' या म्हणीप्रमाणे दरमहा केलेली बचत ठराविक कालावधीतनंतर आपल्या गरजेच्यावेळी उपयोगी पडू शकते. घरगुती आणि किरकोळ स्वरूपाची बचत प्रत्येकजण नेहमीच करतो, मात्र त्याच बचतीला जर थोडे मोठे रुप दिले तर ती बचत आपल्याबरोबरच आपल्या मैत्रिणींचीही गरज भागवू शकते सोबतच आपल्याला उत्पन्नही मिळवून देऊ शकते. हीच संकल्पना आहे 'बचत गट'. आजवर अनेक अशक्य आणि अवघड वाटणाऱ्या गोष्टी बचत गटातील महिलांनी एकीच्या आणि ताकदीच्या बळावर यशस्वीपणे केलेल्या आहेत. काही वादग्रस्त अपवाद आहेत पण बचत गटाच्या व्यवहारामध्ये विश्वासार्हता, पारदर्शकता आणि सर्वसमावेशकता असेल तर तो नक्कीच अतुलनीय कार्य करु शकेल.

**वैशिष्ट्ये :**

१) नियमित बचत, नियमित कर्जव्यवहार आणि बँकींग सेवांच्या माध्यमातून आर्थिक शिस्तीची सवय लावणे.

२) संघटित प्रयत्नातून आर्थिक साक्षरता आणि आर्थिक उन्नतीसाठी प्रयत्न करणे.

३) शासकीय योजनांसाठी आवश्यक योग्य पद्धतीने हिशोबपत्रे, इतिवृत्त लिहिण्याची तयारी करून घेणे.

४) महाविद्यालयीन शिक्षण घेत असतानाच आर्थिक क्षमता वाढल्यामुळे पदवी घेऊन बाहरे पडत असताना स्वभांडवलावर आधारित उद्योग व्यवसायाची निर्मिती करणे.

५) सलग तीन वर्षामध्ये सातत्यपूर्ण मार्गदशर्नातून स्वतःची तसेच समुहाची आर्थिक सक्षमता वृध्दिंगत करणे.

**नियमः**

१) प्रत्येक जिल्ह्यातून फक्त तीन महाविद्यालयांना संधी दिली जाईल.

२) प्रत्येक महाविद्यालयातून पंधरा मुलींचा एक गट तयार करण्यात येईल.

३) बचत गटामध्ये सहभागी होण्यासाठी मुलीचे वय १८ वर्षे पूर्ण असावे लागेल.

४) आवश्यक कागदपत्रे –

१) आधार कार्ड  २) पॅन कार्ड  ३) रेशन कार्ड  ४) ४ फोटो

**प्रशिक्षण कार्यक्रम :**

१) तीन वर्ष सातत्यपूर्ण प्रशिक्षण व मार्गदर्शन उपलब्ध करुन दिले जाईल.

२) स्वयंरोजगार व व्यवसायासाठी आवश्यक ते सर्व प्रकल्प अहवाल तयार करणे.

व्यावसायिक मार्गदर्शनासाठी तज्ज्ञ व्यक्तींची उपलब्धता करुन दिली जाईल.

३) बचत गट स्थापनेपासून ते व्यवसायनिर्मितीपर्यंत असणाऱ्या अनेकविध टप्प्यांवर मार्गदर्शन आणि पाठपुरावा.

# अक्षय्या नारी शक्ती संघ

**कार्यकृती आराखडा :**

पहिले वर्ष :

अ) बचत गट स्थापना

१. नावनिश्चिती
२. अध्यक्ष व सचिव निश्चिती
३. बचत रक्कम निश्चिती
४. बचत गट नोंदणी
५. शिक्के तयार करून घेणे
६. बँकेत बचत खाते उघडणे
७. उद्देश निश्चिती

ब) नियमित मासिक बचत

क) नियमित ठराव लेखन आणि हिशोबपत्रक लिहीणे

ड) बचत गट सादरीककरण अहवाल तयार करणे

इ) तीन महिन्यानंतर अंतर्गत कर्जव्यवहार

ई) नियमित परतफेड

फ) सहा महिन्यानंतर बँक कर्जव्यवहार

दुसरे आणि तिसरे वर्ष: गटाच्या उद्देशपूर्तीसाठी आवश्यक ते प्रयत्न करणे.

**फायदे :**

१. बचत गटासाठी असणाऱ्या शासकीय योजनेमधून शहरी भागासाठी १०००० तर ग्रामीण भागासाठी १५००० अनुदान उपलब्ध

२. नियमित बचत, नियमित बैठक आणि नियमित परतफेड या नियमानुसार सहा महिन्यानंतर दीड लाखापासून ते सहा लाखापर्यंत बँक कर्ज उपलब्ध

३. बँक कर्जावरील व्याजावर सूट

४. आर्थिक व्यवहार आणि बँकेचे व्यवहार यांच्या माहितीमुळे व्यावहारिक ज्ञानात भर

५. बचत गटाच्या माध्यमातून स्वयंरोजगारनिर्मिती तसेच व्यावसायिकतेसाठी स्वयंप्रेरणा

६. स्वनिधी उपलब्ध झाल्याने व्यवसायाच्या सुरुवातीच्या भांडवलाची सोय

७. व्यवसायाची तसेच गटांची आर्थिक गणिते समजल्यामुळे आर्थिक शिस्त लागण्याचा फायदा तसेच भविष्याततील आर्थिक अडचणींसाठी तरतूद

८. बचत गट म्हणून नोंद झाल्याने अनेक शासकीय योजना तसेच निविंदासाठी अर्ज करून त्याचा लाभ

**' सक्षम युवती स्वाभिमानी युवती '**

# इतर उपक्रम

## उद्योजक संसद

विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकीय कौशल्य वाढीस लागावे यासाठी महाविद्यालय स्तरावर उद्योजकीय कामकाजाची व कंपनीच्या व्यवस्थापनाची माहिती व्हावी या उद्देशाने उद्योजक संसदेची निर्मिती केली जाईल. त्याची नियमावली पुढील प्रमाणे असेल

१. महाविद्यालयामध्ये शिकणाऱ्या प्रथम वर्षाचा विद्यार्थ्यांच्या व्यतिरिक्त कोणत्याही वर्गातील पंधरा विद्यार्थ्यांची निवड उद्योजक संसदेसाठी केली जाईल.

२. कंपनी व्यवस्थापनामध्ये असणाऱ्या वेगवेगळ्या पदनामाने सदर विद्यार्थ्यांना उद्योजक संसदेमध्ये संबोधण्यात येईल.

३. सदर उद्योजक संसदेला सेंटर ऑफ एक्सलन्स अंतर्गत प्रतिवर्षी रुपये १ लाख भांडवल उपलब्ध करून दिले जाईल.

४. सदर उद्योजकीय संसदेने आपल्या अवतीभवतीच्या परिसराचा तसेच क्षमतांचा विचार करून एक उद्योजकीय संकल्पना निवडावी व तिच्या विस्तारासाठी काम करावे.

५. उद्योजक संसदेने मिळवलेल्या नफ्यातील नियमानुसार काही भाग त्यांना देण्यात येईल.

६. उद्योजक संसदेतील किंवा अन्य कोणत्याही विद्यार्थ्यांनी अपेक्षित किंवा मागणी केलेल्या तज्ज्ञ व्यक्तीचे मार्गदर्शन ऑनलाईन किंवा ऑफलाइन पद्धतीने उपलब्ध करुन दिले जाईल.

७. राज्यभरातील उद्योग संसद मध्ये सहभागी विद्यार्थ्यांना एकत्रित उद्योजकीय कौशल्याचे प्रशिक्षण उपलब्ध करून दिले जाईल.

सामंजस्य करार

महाविद्यालयीन स्तरावर वेगवेगळी औद्योगिक आस्थापने तसेच राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय शैक्षणिक संस्थांसोबत करार करुन त्या माध्यमातून अनेक विद्यार्थीभिमुख उपक्रम राबविण्यासाठी सहकार्य केले जाईल.

उदा. पोलीस भरती करार, Add on courses चा करार

## रोजगार मेळावे

महाविद्यालयातून उत्तीर्ण होणारे विद्यार्थी, त्याचबरोबर महाविद्यालयाच्या परिसरामध्ये असणारे पास आऊट आणि ड्रॉप आऊट विद्यार्थी यांच्यासाठी वेगवेगळ्या खाजगी आस्थापनांमध्ये उपलब्ध असणाऱ्या नोकरीच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने शासकीय आस्थापनांच्या सहकार्याने महाविद्यालय स्तरावर रोजगार मेळावे आयोजित करून विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न उपक्रमांतर्गत केला जाणार आहे.

# करिअर कट्टा पदाधिकारी कार्यपध्दती

### महाविद्यालयीन समन्वयक

१. महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना करिअर कट्टाच्या विविध उपक्रमाची माहिती व्हावी, या उद्देशाने शैक्षणिक वर्षांच्या प्रारंभी इंडक्शन उपक्रमाच्या माध्यमातून सर्व उपक्रम विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी कार्यशाळा घेणे, सद्यस्थितीला ऑनलाईन कार्यशाळेतील अपेक्षित.

२. करिअर कट्टाच्या माध्यमातून ऑनलाईन उपक्रम ज्या यूट्यूब चॅनलच्या माध्यमातून सर्वांसाठी आयोजित केले जातात, त्या यूट्यूब चॅनल वरील उपक्रमांची माहिती देणे, भारतीय संविधानाचे पारायण, वृत्तवेध – स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी या कार्यक्रमाच्या नियमित हजेरीसाठी मुलांना त्या चॅनेल सबस्क्राईब करावे यासाठी प्रेरणा देणे.

३. सायबर सिक्युरिटी सारख्या कोर्स, यूपीएससीचे प्रशिक्षण असेल किंवा यासारखे जे विविध उपक्रम राबवले जात आहेते या उपक्रमांमधून मुलांची सातत्यपूर्ण उपस्थिती व सहभाग वाढावा, यासाठी विद्यार्थ्यांशी समन्वय साधणे.

४. उपक्रम जास्तीत जास्त विद्यार्थीभिमुख व्हावा, यासाठी महाविद्यालयांमध्ये असणाऱ्या वेगवेगळ्या विभागांची समन्वय साधणे आणि त्या विभागातील विद्यार्थ्यांच्या गरजांची माहिती पोहोचवणे.

५. वेगवेगळ्या समाज माध्यमांचा, प्रिंट व इलेक्ट्रॉनिक माध्यमाचा वापर करुन उपक्रम विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रयत्न करणे.

६. महाविद्यालयाचे प्राचार्य व व्यवस्थापन यांना या माध्यमातून NACC व अन्य गोष्टींसाठी होणारा उपयोग समजून सांगणे व त्यांचा सक्रिय सहभाग वाढावा, यासाठी मदत करणे.

७. नियमित बैठकीस उपस्थित राहून आपले प्रश्न मांडणे व या उपक्रमाची सातत्यपूर्ण माहिती अद्ययावत ठेवणे.

८. प्राचार्य प्रवर्तक, विभागीय समन्वयक, जिल्हा समन्वयक व महाविद्यालयीन समन्वयक यांच्या समन्वयातून करिअर कट्टा उपक्रमाची जास्तीत जास्त निर्दोष पद्धतीने अंमलबजावणी करता येईल, यासाठी योगदान देणे.

## प्राचार्यांची भूमिका व जबाबदारी

हा उपक्रम जास्तीत जास्त विद्यार्थीभिमुख व्हावा, यासाठी महाविद्यालयात प्राचार्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून महाविद्यालयीन समन्वयक व विद्यार्थी यांच्यामध्ये समन्वय साधत असताना करिअर कट्टा जास्तीत जास्त परिपूर्ण व्हावा, यासाठी आपण सूचना प्रतिक्रिया वेळोवेळी देत राहावे. त्याचबरोबर उपक्रमाच्यावतीने महाविद्यालय प्राचार्यांच्या नियमित बैठका आयोजित केल्या असतील, त्यामध्ये उपस्थित राहून आपल्या सूचना तसेच उपक्रमाबाबत अद्ययावत माहिती घेऊन सदर उपक्रम अधिकाधिक कार्यक्षमपणे महाविद्यालयीन स्तरावर राबवण्यासाठी समन्वयकांना व संबंधित सहकारी प्राध्यापकांमध्ये समन्वय साधण्यासाठी वेळोवेळी आढावा घेणे, अशी प्राचार्यांची महत्त्वाची जबाबदारी अपेक्षित आहे.

## प्राचार्य प्रवर्तकांची भूमिका व जबाबदारी

१. करिअर कट्टाकडून राबवल्या जाणाऱ्या उपक्रमांची माहिती आपल्या जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रयत्न करणे.

२. शिक्षण सहसंचालक कार्यालय तसेच विद्यापीठ व आपल्या जिल्ह्यातील महाविद्यालय यामध्ये करिअर कट्टाच्या उपक्रमासाठी योग्य तो समन्वय साधणे.

३. प्राचार्य प्रवर्तक या नात्याने सेंट्रल पेक्षा स्थानिक नियामक मंडळांतर्गत चाललेल्या कामकाजाचे नियमन करणे.

४. करिअर कट्टाचे उपक्रम जास्तीत जास्त विद्यार्थीभिमुख व्हावेत यासाठी स्थानिक पातळीवरील समस्या व सूचना राज्यस्तरीय बैठकीमध्ये मांडणे.

## जिल्हा नियोजन समिती

# करिअर कट्टा पदाधिकारी कार्यपध्दती

## जिल्हा व विभागीय समन्वयक

### करिअर कट्टा जिल्हा समन्वयक

१. दर महिन्याला एक आपल्या जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयीन समन्वयकांची बैठक घेऊन करिअर कट्टाच्या उपक्रमाविषयी आढावा घेणे व अद्ययावत माहिती देणे.

२. महाविद्यालयीन समन्वयक व प्राचार्य किंवा संस्थाचालक यांना वेळोवेळी येणाऱ्या शंकांचे निरसन करणे, आपल्या पातळीवरील या शंका निरसन करणे, शक्य नसल्यास विभागीय समन्वयक किंवा करिअर कट्टा संबंधित प्रशासकीय व्यक्तींपर्यंत प्रश्न पोहोचवून तो सोडवण्यासाठी प्रयत्न करणे.

३. सदर उपक्रम महाविद्यालयीन विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी महाविद्यालय स्तरावर आयोजित उपक्रमांमध्ये प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणे आणि करिअर कट्टा विषयीची माहिती विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन देणे.

४. उपक्रम जास्तीत जास्त यशस्वी व्हावा, यासाठी महाविद्यालयीन समन्वयक व प्राचार्य यांच्यासाठी वेगवेगळ्या परिसंवादाचे आयोजन करणे.

५. उपक्रमाच्यावतीने राज्य व जिल्हा पातळीवर होणाऱ्या वेगवेगळ्या घडामोडींची माहिती सर्वसामान्यांना व्हावी यासाठी सदर उपक्रमाची योग्य त्या माध्यमांवर प्रसिद्ध देण्यासाठी प्रयत्न करणे.

६. जिल्हा समन्वयक बैठकीमध्ये उपस्थित राहून आपल्या जिल्ह्यातील कामकाजाचा आढावा देणे आणि विभागीय समन्वयक यांच्या सहकाऱ्यांनी आपल्या विभागांमध्ये जिल्ह्याचे काम उठावदार दिसण्यासाठी प्रयत्न करणे.

### करिअर कट्टा विभागीय समन्वयक

१. दर महिन्याला एक याप्रमाणे आपल्या विभागातील सर्व समन्वयकांची बैठक घेऊन करिअर कट्टाच्या उपक्रमांविषयी आढावा घेणे व अद्ययावत माहिती देणे.

२. महाविद्यालयीन समन्वयक व जिल्हा समन्वयक, प्राचार्य किंवा संस्थाचालक यांना वेळोवेळी येणाऱ्या शंकांचे निरसन करणे व त्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न करणे.

३. सदर उपक्रम महाविद्यालयीन विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी महाविद्यालय स्तरावर व जिल्हा स्तरावर आयोजित उपक्रमांमध्ये प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणे आणि करिअर कट्टा विषयाची माहिती विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देणे.

४. उपक्रम जास्तीत जास्त यशस्वी व्हावा, यासाठी महाविद्यालयीन समन्वयक व प्राचार्य यांच्यासाठी वेगवेगळ्या परिसंवादाचे आयोजन करणे.

५. उपक्रमाच्या वतीने राज्य व जिल्हा पातळीवर होणाऱ्या वेगवेगळ्या घडामोडींची माहिती सर्वसामान्यांना व्हावी, यासाठी सदर उपक्रमाची योग्य त्या माध्यमांवर प्रसिद्धी देण्यासाठी प्रयत्न करणे.

६. विभागीय समन्वयकांनी बैठकीमध्ये उपस्थित राहून आपल्या विभागातील कामकाजाचा आढावा देणे आणि आपल्या विभागाचे कामकाज उठावदार दिसण्यासाठी प्रयत्न करणे.

# समन्वयक बैठकीचे नियोजन

करिअर कट्टा उपक्रमांतर्गत नेहमी होणाऱ्या आढावा बैठकी संदर्भात नियोजन करिअर कट्टा हा उपक्रम जास्तीत जास्त विद्यार्थीभिमुख व्हावा आणि कार्यपद्धती जास्तीत जास्त परिपूर्ण व्हावी, कार्यक्षमता वाढावी या उद्देशाने नेहमीच बैठकीचे आयोजन केले जाते त्याचे स्वरूप पुढील प्रमाणे

### १. राज्यस्तरीय सर्व समन्ययकांची बैठक

राज्यातील सर्व महाविद्यालयीन करिअर कट्टा समन्वयकांची नियमित बैठक आठवड्याला शुक्रवार सायंकाळी ०७.०० वाजता घेण्यात येईल.

### २. सर्व जिल्हा समन्वयकांची राज्यस्तरीय बैठक

राज्यातील सर्व जिल्हा समन्वयकांची राज्यस्तरीय बैठक दर महिन्याच्या ०१ तारखेला सायंकाळी ०७.०० वाजता घेण्यात येईल.

### ३. महाविद्यालयीन समन्वयकांची जिल्हास्तरीय बैठक

जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयीन समन्वयकांची बैठक महिन्यातून एका जिल्हा समन्वयकाच्या अध्यक्षतेखाली घेण्यात येईल. जिल्ह्यात करिअर कट्टाचे उपक्रम राबवित असताना येणाऱ्या अडचणी व उपक्रमाच्या वाढीसाठी व नियोजनासाठी या बैठकी घेतल्या जातील.

### ४. प्राचार्य प्रवर्तकांची राज्यस्तरीय बैठक

राज्यातील सर्व प्राचार्य प्रवर्तकांची बैठक प्रत्येक महिन्याच्या शेवटच्या शनिवारी सायंकाळी ०७.०० वाजता होईल.

**वार्षिक उपक्रम दिनदर्शिका**

| तारीख | कार्यक्रम |
|---|---|
| 1 जानेवारी | कृतज्ञता दिन |
| ३ ते ७ जानेवारी | करिअर संसद अधिवेशन |
| 12 जानेवारी | संकल्प दिन |
| 16 जानेवारी | स्टार्टअप दिन-Start Up Day |
| 25 फेब्रुवारी | करिअर कट्टा वर्धापन दिन |
| 8 मार्च | महिला दिन |
| 1 मे | महाराष्ट्र दिन |
| 22 जून | स्वागत सोहळा |
| 15 जुलै | कौशल्य विकास दिन |
| 9 ऑगस्ट | क्रांती दिन |
| 26 नोव्हेंबर | संविधान दिन |

# दैनंदिन उपक्रम

## भारतीय संविधानाचे पारायण

संविधानाचे महत्त्व आजच्या तरुण पिढीमध्ये रुजवण्यासाठी करिअर कट्टा अंतर्गत राष्ट्रीय मानवाधिकार आयोग, भाजप सरकार आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने भारतीय संविधानाचे पारायण उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाद्वारे भारतीय संविधानात असणारी विविध कलमे, परिशिष्ट यांची माहिती व संविधानाचे महत्त्व अतिशय सोप्या भाषेमध्ये ॲड. धनराज वंजारी (माजी सहाय्यक पोलीस अधिकारी) या उपक्रमाद्वारे सर्वांपर्यंत पोहोचवले आहे. श्री. यशवंत शितोळे (अध्यक्ष, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र) व ॲड. धनराज वंजारी (माजी सहाय्यक पोलीस अधिकारी) यांनी हा उपक्रम जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी अतिशय नेटकी मांडणी केली होती. तसेच आजच्या काळात असणारी संविधानाची स्थिती यावर देखील अतिशय विवेकपूर्ण विवेचन केले आहे. महाविद्यालयीन विद्यार्थी व प्राध्यापक या सर्वांसाठी हा उपक्रम https: // youtube.com/c/uvajagar या यूट्यूब चॅनेल वर उपलब्ध आहे.

## वृत्तवेध चालू घडामोडींसाठी

चालू घडामोडींच्या अभ्यासाची व्याप्ती पूर्व परीक्षा, मुख्य परीक्षा व मुलाखत या तिन्ही टप्प्यांवर विस्तारलेली आहे. चालू घडामोडी हा नुसता एक घटक विषय नाही तर स्पर्धा परीक्षेत समाविष्ट असणाऱ्या प्रत्येक विषयाशी अनिवार्यपणे जोडलेला एक महत्वाचा घटक विषय आहे. चालू घडामोडी मध्ये अर्थव्यवस्था, राज्यव्यवस्था, तंत्रज्ञानातील बदल, विज्ञान विषयक माहिती असे सर्वच विषयात उमेदवाराचे समकालीन आकलन तपासण्याचा प्रयत्न आयोगाद्वारे केला जातो. चालू घडामोडी हा स्पर्धा परीक्षेच्या अभ्यासाचा पाया बनला आहे, हीच बाब लक्षात घेऊन महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करिअर कट्टा या उपक्रमांतर्गत भारताच्या अमृत महोत्सवी स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून दररोजच्या घडामोडी आणि दररोजच्या वर्तमानपत्रातील येणाऱ्या बातम्यांचे स्पर्धा परीक्षेच्या दृष्टीने विश्लेषण करण्याच्या उद्देशाने वृत्तवेध स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी या कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. महाविद्यालयीन विद्यार्थी प्राध्यापक या सर्वांसाठी हा उपक्रम https://youtube.com/c/uvajagar या यूट्यूब चॅनेल वर सकाळी ११.३० वाजता असतो. तसेच याचे प्रमाणपत्र दिले जाते.

# महाविद्यालयीन स्पर्धा




## महाविद्यालयीन करिअर कट्टा प्रोत्साहन स्पर्धा

करिअर कट्टाच्या वतीने सर्व सहभागी महाविद्यालयांमध्ये दरवर्षी 'राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे' महाविद्यालयीन करिअर कट्टा प्रोत्साहन स्पर्धा या नावाने सदर स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार असून २०२५–२६ या कालावधीमध्ये सहभागी महाविद्यालयाने केलेल्या कामकाजाचे ५० मार्काचे मूल्यमापन निवड समितीमार्फत करण्यात येईल व जिल्हास्तरीय महाविद्यालयाची निवड करण्यात येईल.

राज्यातील एकूण जिल्ह्यांमध्ये प्रथम येणाऱ्या जिल्हास्तरीय महाविद्यालयांमधून राज्यस्तरीय महाविद्यालयाची निवड करण्यात येईल.

सदर निवड प्रक्रिया १० फेब्रुवारी पूर्वी पूर्ण केली जाईल व २५ फेब्रुवारीला करिअर कट्टाच्या 'वर्धापन दिनानिमित्त' प्रतिवर्षी सदर महाविद्यालयांचा 'बक्षीस वितरण समारंभ केंद्रीय पद्धतीने' आयोजित करण्यात येईल

**महाविद्यालयीन करिअर कट्टा प्रोत्साहन स्पर्धा मानधन स्वरुप**

| राज्यस्तरीय करिअर कट्टा प्रोत्साहन स्पर्धा | जिल्हास्तरीय करिअर कट्टा प्रोत्साहन स्पर्धा |
|---|---|
| राज्यस्तरीय प्रथम येणाऱ्या महाविद्यालयास<br>एक लाख रुपये रोख, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र | जिल्हास्तरीय प्रथम येणाऱ्या महाविद्यालयास<br>सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र |
| राज्यस्तरीय द्वितीय येणाऱ्या महाविद्यालयास<br>पंचाहत्तर हजार रुपये रोख, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र | जिल्हास्तरीय द्वितीय येणाऱ्या महाविद्यालयास<br>सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र |
| राज्यस्तरीय तृतीय येणाऱ्या महाविद्यालयास<br>पन्नास हजार रुपये रोख, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र | जिल्हास्तरीय तृतीय येणाऱ्या महाविद्यालयास<br>सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र |
| विभागीय प्रथम येणाऱ्या महाविद्यालयास<br>पाच हजार रुपये रोख , सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र<br>विभागीय द्वितीय येणाऱ्या महाविद्यालयास<br>तीन हजार रुपये रोख , सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र<br>विभागीय तृतीय येणाऱ्या महाविद्यालयास<br>दोन हजार रुपये रोख , सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र | उत्कृष्ट प्राचार्य,<br>जिल्हास्तरीय उत्कृष्ट समन्वयक, विभागीय स्तरावर उत्कृष्ट समन्वयक व राज्यस्तरीय उत्कृष्ट समन्वयक स्पर्धा या प्रत्येकांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येईल. स्पर्धेमध्ये सहभागी होऊ इच्छिणाऱ्या सर्व महाविद्यालयांना व समन्वयकांना याबाबतची सविस्तर माहिती कळविण्यात येईल. |

## स्पर्धेविषयी नियम व अटी

महाविद्यालयांना स्पर्धेमध्ये सहभागी होण्यासाठी एकूण विद्यार्थी संख्येमधून १०% गळती वजा करावी. येणाऱ्या संख्येच्या १०% किंवा १०० यापैकी जी संख्या लहान असेल ती संख्या महाविद्यालयांच्या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी आवश्यक विद्यार्थी संख्या असेल.

उत्कृष्ट महाविद्यालयीन करिअर संसद तसेच उत्कृष्ट तालुका समन्वयक या दोन वर्गाचा स्पर्धेमध्ये नव्याने सहभाग करण्यात येईल.

राज्यस्तरीय स्पर्धानियोजन समितीच्या बैठकीमध्ये स्पर्धा घोषीत करण्यापूर्वी घेण्यात आलेले निर्णय, नियम व अटी स्पर्धेसाठी लागू असतील. या सर्वांची सविस्तर माहिती स्पर्धा घोषीत करतेवेळी दिली जाईल.

## समन्वयक नियुक्ती पत्राचा नमुना

प्रति,
मा. अध्यक्ष
महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र,
महाराष्ट्र राज्य.

विषय : महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी आयएएस आपल्या भेटीला आणि उद्योजक आपल्या भेटीला हा उपक्रम राबवून याबाबत महाविद्यालय समन्वयक नियुक्तीची माहिती सादर करणेबाबत...

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी आयएएस आपल्या भेटीला आणि उद्योजक आपल्या भेटीला उपक्रम राबविण्याकरीता महाविद्यालय समन्वयक नियुक्ती करण्यात आलेली असून त्यांचा योजनेमध्ये महभाग करून घ्यावा ही विनंती.

| अ.क्र. | उपक्रम | समन्वयकाचे नाव | मोबाईल क्रमांक | व्हाट्स अप क्रमांक | ई-मेल आय.डी. |
|---|---|---|---|---|---|
| १ | आय.ए.एस. आपल्या भेटीला | | | | |
| २ | उद्योजक आपल्या भेटीला | | | | |

संदर्भीय पत्रात निर्दिष्ट केलेल्या प्रपत्रात माहिती सादर करीत आहोत करिता आपल्या माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव सविनय सादर

प्राचार्य
प्राचार्यांचे नाव
महाविद्यायाचे नाव

सही व शिक्का

## समन्वयक बदल पत्राचा नमुना

प्रति,
मा. अध्यक्ष
महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र
महाराष्ट्र राज्य

विषय : महाविद्यालयीन समन्वयक बदलाबाबत....

महोदय,
उपरोक्त विषयास अनुसरून आपणास विनंती अशी की महाविद्यालयाचे करिअर कट्टाचे समन्वयक यामध्ये बदल करण्यात आला असून ती माहिती आपल्या माहितीस्तव पाठवत आहे.

महाविद्यालयाचे पूर्वीचे समन्वयकाचे नाव

| अ.क्र. | समन्वयकाचे नाव | समन्वयक विभाग | ईमेल आय.डी. | मोबाईल नं. |
|---|---|---|---|---|
| १ | | आय.ए.एस. आपल्या भेटीला | | |
| २ | | उद्योजक आपल्या भेटीला | | |

महाविद्यालयाच्या नवीन समन्वयकाचे नाव

| अ.क्र. | समन्वयकाचे नाव | समन्वयक विभाग | ईमेल आय.डी. | मोबाईल नं. |
|---|---|---|---|---|
| १ | | आय.ए.एस. आपल्या भेटीला | | |
| २ | | उद्योजक आपल्या भेटीला | | |

संदर्भीय पत्रात निर्दिष्ट केलेल्या प्रपत्रात माहिती सादर करीत आहोत.
करिता आपल्या माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव सविनय सादर

प्राचार्य
प्राचार्यांचे नाव
महाविद्यायाचे नाव

सही व शिक्का

## करिअर संसद नियुक्ती पत्राचा नमुना

प्रति,
अध्यक्ष
महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान
सहाय्यता केंद्र,
महाराष्ट्र राज्य.

विषय : सन २०२५-२६ च्या करिअर संसदेची माहिती देण्याबाबत...

महोदय,
उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कविण्यात येते की, महाविद्यालयांमध्ये २०२५-२६ साठी करिअर संसदेची स्थापना करण्योत आलेली आहे. सदर संसदेची माहिती विहित नमुन्यामध्ये आपल्या माहितीसाठी सादर करत आहोत. तरी याची नोंद घ्यावी, ही विनंती.

| क्र. | पदनाम | विद्यार्थ्यांचे नाव | मोबाईल नंबर |
|---|---|---|---|
| १. | मुख्यमंत्री | | |
| २. | नियोजन मंत्री | | |
| ३. | कायदे व शिस्त पालन मंत्री | | |
| ४. | सामान्य प्रशासन मंत्री | | |
| ५. | माहिती व प्रसारण मंत्री | | |
| ६. | उद्योजकता विकास मंत्री | | |
| ७. | रोजगार स्वंयरोजगार मंत्री | | |
| ८. | कौशल्य विकास मंत्री | | |
| ९. | संसदीय कामकाज मंत्री | | |
| १० | महिला व बालकल्याण मंत्री | | |
| ११ | सदस्य | | |

आपला विश्वासू

प्राचार्यांचे नाव ______________________

महाविद्यालयाचे नाव ______________________ सही व शिक्का

# राज्यस्तरीय समिति

| राज्यस्तरीय करिअर कट्टा व गर्जे मराठी ग्लोबल समन्वय समिती | | |
|---|---|---|
| **अ. क्रं.** | **नाव** | **कॉलेजचे नाव** |
| 1 | डॉ. दिनानाथ पाटील | करिअर कट्टा |
| 2 | डॉ. पुंडलिक रसाळ | करिअर कट्टा |
| 3 | प्राचार्य डॉ. मनोहर टी. पाटील | करिअर कट्टा |
| 4 | प्राचार्या डॉ. प्रज्ञा येनकर | विद्या भारती महाविद्यालय, अमरावती |
| 5 | प्राचार्य डॉ. प्रवीनसिंग गिरासे | कै. एम. डी. सिसोदे महाविद्यालय, नरडाणा, जि. धुळे |
| 6 | प्राचार्य डॉ. निंबा वाल्हे | श्री. शि. वि. प्र. संस्थेचे श्रीमती पा. बा. बागल कला व वाणिज्य महाविद्यालय, दोडाईचा |
| 7 | प्रा. दुर्गेश फोंडेकर | करिअर कट्टा |
| 8 | डॉ. रंजना जीवने | श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालय पुसद |
| 9 | प्रा.भगवान गावित | पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे, शंकरराव भेलके महाविद्यालय, नसरापूर, |
| 10 | प्रा. डॉ. विलास सुद्रिक | श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय,श्रीगोंदा |
| 11 | प्रा. डॉ. सोनल कामे | श्रीमती. राधादेवी गोयंका वुमन कॉलेज, अकोला |
| 12 | प्रा. डॉ. गजेंद्रसिंग पचलोरे | विनायक विज्ञान महाविद्यालय, खांडेश्वर, नांदगाव |
| 13 | प्रा. डॉ. दिलीप भिसे | यशवंतराव चव्हाण कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अंबाजोगाई जि बीड |
| 14 | प्रा. डॉ. मनोज व्यवहारे | कला महाविद्यालय, बुलढाणा |
| 15 | डॉ. मुठ्ठे पी. आर. | यशवंत महाविद्यालय, नांदेड. |
| 16 | प्रा. डॉ.संतोष शेंबाळे | महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, मुखेड |
| 17 | प्रा. प्राजक्ता राऊत | अभिनव पदवी महाविद्यालय, गोडदेव, भाईंदर |
| 18 | डॉ. दिगंबर रोडे | श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी |
| 19 | डॉ. नितिन पडवळ | शंकरराव पाटील महाविद्यालय भूम, धाराशीव |
| 20 | प्रा. डॉ. नीता कांबळे | अण्णासाहेब मगर महाविद्यालय हडपसर |

| नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला अनुरूप कौशल्यवृद्धीचे कोर्स तयार करण्यासाठीचे अभ्यास मंडळ (Board of Studies for NEP aligned courses) | | |
|---|---|---|
| अ. क्रं. | नाव | कॉलेजचे नाव |
| 1 | मा. प्राचार्य डॉ. अतुल साळुंखे, चेअरमन | डॉ. सी. डी. देशमुख वाणिज्य व सौ. के. जी. ताम्हाणे कला महाविद्यालय |
| 2 | मा. प्राचार्य डॉ. सुजित मेत्रे | श्री बिंझानी नगर महाविद्यालय, नागपूर |
| 3 | मा. प्रफुल्ल पाठक | Former Secretary,<br>Power Sector Skill Council, NSDC |
| 4 | मा. शंकर जाधव | Senior Partner & CIO, Singhania & Co<br>Earlier MD - BSE Investments Ltd<br>(holding company of BSE)<br>Head - Strategy of Bombay Stock Exchange |
| 5 | मा. भूषण कोळेकर | माजी महाव्यवस्थापक, SBI |
| 6 | मा. किशोर गोरे | संचालक,<br>ग्लोबल नगरी (USA) |
| 7 | मा. चित्रा उबाळे | Wake Up Placements and Consultants |
| 8 | मा. प्रा. संदेश कासार | अगस्ति कला, वाणिज्य व दादासाहेब रुपवते विज्ञान महाविद्यालय, अकोले |
| 9 | मा. प्राचार्य डॉ. अल्विन मेनझेस | अभिनव कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, गोडदेव, भाईंदर पूर्व |
| 10 | मा. प्रा. डॉ. प्रभाकर घोडके | हरिभाई व्ही. देसाई महाविद्यालय, पुणे |
| 11 | मा. प्रा. डॉ. सुनिल भादुले | डी. बी. जे. महाविद्यालय, चिपळूण |
| 12 | मा. डॉ. एस. डी. देशभ्रतार | कमला नेहरू कॉलेज, नागपूर |
| 13 | मा. डॉ मोहम्मद असिफ इकबाल | मिल्लिया आर्ट्स सायन्स अँड मॅनेजमेंट सायन्स कॉलेज बीड |
| 14 | मा. प्रा. दुर्गेश फोंडेकर | क. जे. सोमैया कॉलेज, विद्याविहार, मुंबई |
| 15 | मा. डॉ. दीपा वर्मा | विवा कॉलेज, विरार |
| 16 | मा. डॉ. प्राजक्ता राऊत | अभिनव कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, गोडदेव, भाईंदर पूर्व |
| 17 | मा. प्रा. स्नेहा जगदाळे | श्री नारायण गुरू कॉलेज ऑफ कॉमर्स |
| 18 | मा. प्रा. सायली लाखे-पिदळी | रामकृष्ण वाघ कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स |
| 19 | मा. डॉ. बबन सिनगारे | द. ग. तटकरे महाविद्यालय, माणगाव |

# राज्यस्तरीय समिती

| राज्यस्तरीय CSR Scrutiny व नियोजन समिती | | |
|---|---|---|
| अ. क्रं. | नाव | कॉलेजचे नाव |
| 1 | डॉ. दिनानाथ पाटील | करिअर कट्टा |
| 2 | डॉ. पुंडलिक रसाळ | करिअर कट्टा |
| 3 | प्राचार्य डॉ. स. ना. भारंबे | मुळजी जेठा महाविद्यालय, जळगाव |
| 4 | प्राचार्य डॉ. सुजित मेत्रे | श्री बिंझाणी नगर महाविद्यालय, नागपूर |
| 5 | डॉ अनुश्री राजेंद्र खैरे | गृह विज्ञान व संगणक महिला महविद्यालय लोणी, अहिल्यानगर |
| 6 | प्रा. दुर्गेश फोंडेकर | करिअर कट्टा |
| 7 | प्रा. डॉ. दिनेश खेडकर | शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती |

| राज्यस्तरीय करिअर संसद समिती | | |
|---|---|---|
| अ. क्रं. | नाव | कॉलेजचे नाव |
| 1 | प्राचार्य डॉ.धनंजय तळवणकर | गो से विज्ञान, कला वाणिज्य महाविद्यालय, खामगांव |
| 2 | प्राचार्य डॉ. पूजा नरवाडकर | भारती विद्यापीठाचे न्यू लॉ कॉलेज सांगली |
| 3 | प्राचार्य डॉ. श्रीकुमार महामुनी | शारदाबाई पवार महिला आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, शारदानगर, बारामती |
| 4 | प्रा. डॉ. रंजना जीवने | श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालय, पुसद |
| 5 | प्रा. डॉ. दीपा वर्मा | विष्णू वामन ठाकूर चॅरिटेबल ट्रस्टचे भास्कर वामन ठाकूर कॉलेज ऑफ सायन्स, यशवंत केशव पाटील कॉलेज ऑफ कॉमर्स, विद्या दयानंद पाटील कला महाविद्यालय (VIVA कॉलेज) |
| 6 | प्रा. डॉ. बबन सिनगारे | द.ग.तटकरे महाविद्यालय माणगाव रायगड |
| 7 | प्रा. डॉ. अजित दिघे | आनंदीबाई रावराणे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय वैभववाडी |
| 8 | डॉ. प्रा. एस डी देशभ्रतार | कमला नेहरू महाविद्यालय |
| 9 | प्रा. डॉ. संजय किसन खिलारे | विद्या प्रतिष्ठानचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, विद्यानगरी बारामती |

# राज्यस्तरीय समिती

| राज्यस्तरीय आर्थिक साक्षरता समिती | | |
|---|---|---|
| अ. क्रं. | नाव | कॉलेजचे नाव |
| 1 | प्राचार्य डॉ. सुजित मेत्रे | श्री बिंझाणी नगर महाविद्यालय, नागपूर |
| 2 | प्रा. सीमा रविंद्र बाजी | लेट जी. एन. सपकाळ कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग, नाशिक |
| 3 | प्रा. शिवकांत पुपलवाड | डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, पेठ वडगाव |
| 4 | प्रा. डॉ. भागवत परकाळ | अहमदनगर महाविद्यालय, अहिल्यानगर |
| 5 | डॉ. गायत्री गजानन कुकडे | राणी इंदिराबाई भोसले महाविद्यालय कुही |
| 6 | जयसिंग गोवर्धन चवरे | कला व विज्ञान महाविद्यालय सावर्डे. ता.चिपळूण |
| 7 | डॉ. मनोज लिंबराज सोमवंशी | शंकरराव जावळे पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, लोहारा जि. धाराशिव |

| राज्यस्तरीय कौशल्य विकास समिती | | |
|---|---|---|
| अ. क्रं. | नाव | कॉलेजचे नाव |
| 1 | प्राचार्य डॉ. महेंद्र रघुवंशी | जी. टी. पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नंदुरबार |
| 2 | प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर म्हशाखेत्री | कर्मवीर दादासाहेब देवतळे महाविद्यालय, चामोर्शी |
| 3 | प्राचार्य डॉ. श्रीधर कोल्हे | जयक्रांती महाविद्यालय लातूर |
| 4 | प्रा. श्रुती सुनील पाटील | मोहिंदर सिंग काबल सिंग पदवी महाविद्यालय, कल्याण(पश्चिम) ठाणे |
| 5 | प्रा. सीमा रविंद्र बाजी | लेट जी. एन. सपकाळ कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग, नाशिक |
| 6 | प्रा. डॉ. डी. एस. पाटील | जी. टी. पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नंदुरबार |
| 7 | प्रा. डॉ. रेखा मग्गीरवार | शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती |
| 8 | डॉ. मंगेश शेषराव खराटे | शंकरराव पाटील महाविद्यालय भूम, धाराशीव |
| 9 | डॉ. सत्यनारायण मुरलीधर आरडे | यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय, वारणानगर |
| 10 | प्रा.संगिता जगन्नाथ बावगे | व्ही. जी. शिवदारे कॉलेज ऑफ आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स, सोलापूर |

# राज्यस्तरीय समिती

| राज्यस्तरीय पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण समिती | | |
|---|---|---|
| अ. क्रं. | नाव | कॉलेजचे नाव |
| 1 | प्राचार्य डॉ.सतीशचंद्र सुर्यवंशी | श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय,श्रीगोंदा |
| 2 | प्राचार्य डॉ. भगवान रजपूत | कॉ. गोदावरी शामराव परुळेकर कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, तलासरी |
| 3 | डॉ. सुनिल ओगले | विद्या प्रतिष्ठानचे, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय बारामती |
| 4 | डॉ. प्रविण लामखाडे | राणी इंदिराबाई भोसले महाविद्यालय, कुही |
| 5 | प्रा. राजेंद्र भाऊसाहेब झोळेकर | क्रांतिवीर वसंतराव नारायणराव नाईक शिक्षण प्रसारक संस्थेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय नाशिक |
| 6 | डॉ. संतोष संग्राम शेंबाळे | महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, मुखेड |
| 7 | डॉ. साखरे दत्तात्रय यशवंत | रामकृष्ण परमहंस महाविद्यालय धाराशिव. |
| 8 | प्रा.अस्मिता मुकुंद पाटील | शेठ. ज. नौ. पालीवाला कॉमर्स,सायन्स व आर्टस कॉलेज पाली , सुधागड रायगड |
| 9 | प्रा.अर्जुन केशवराव कटके | श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय उमरगा |

| राज्यस्तरीय प्रकाशन संपादकीय समिती | | |
|---|---|---|
| अ. क्रं. | नाव | कॉलेजचे नाव |
| 1 | प्राचार्य डॉ. शरयू तायवाडे | तायवाडे कॉलेज, महादुला, कोराडी |
| 2 | प्राचार्य डॉ. संजय माधव सानप | के. व्ही. एन. नाईक शिक्षण प्रसारक संस्थेचे आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज |
| 3 | प्राचार्य डॉ. दत्ता पाटील | डॉ. घाळी कॉलेज, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर |
| 4 | प्रा. डॉ. प्रभाकर घोडके | हरिभाई व्ही. देसाई महाविद्यालय, पुणे |
| 5 | मा. प्रा. वर्षा वैद्य | तायवाडे महाविद्यालय, महदुला-कोराडी |
| 6 | प्रा. संदेश कासार | अगस्ति कला, वाणिज्य व दादासाहेब रुपवते विज्ञान महाविद्यालय, अकोले |
| 7 | प्रा.भगवान गावित | पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे, शंकरराव भेलके महाविद्यालय, नसरापूर, |
| 8 | प्रा. ममता पळसपगार | राजर्षी शाहू सायन्स कॉलेज, चांदुर रेल्वे |
| 9 | प्रा. सायली पिदळी | रामकृष्ण वाघ कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स, कोराडी रोड, बोखारा, नागपूर |

# राज्यस्तरीय समिती

| राज्यस्तरीय महाविद्यालयीन स्पर्धा नियोजन समिती | | |
|---|---|---|
| अ. क्रं. | नाव | कॉलेजचे नाव |
| 1 | प्राचार्य डॉ. स. ना. भारंबे | मुळजी जेठा महाविद्यालय, जळगाव |
| 2 | प्राचार्य डॉ. शरयू तायवाडे | तायवाडे कॉलेज, महादुला, कोराडी |
| 3 | प्राचार्य डॉ. अतुल साळुंखे | कोएसोचे डॉ.सी. डी. देशमुख वाणिज्य व सौ. के. जी. ताम्हाणे कला महाविद्यालय |
| 4 | प्राचार्य डॉ.राजेंद्र रामदास अहिरे | विद्या विकास मंडळाचे सीताराम गोविंद पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, साक्री जि. धुळे |
| 5 | प्राचार्य डॉ. राजधर टेमकर | दादापाटील राजळे कला व विज्ञान महाविद्यालय, आदिनाथनगर |
| 6 | प्रा.डॉ.किशोर नरहरी काळे | राजीव गांधी कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय ,करमाड,ता.जि.छत्रपती संभाजीनगर |
| 7 | प्रा.डॉ. अभय चंद्रकांत ठाकूर | श्री शिवाजी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय मोताळा |
| 8 | प्रा.दिपक धोंडीराम भगुरे | राष्ट्रीय कॉलेज ऑफ फार्मसी, हतनूर ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर |
| 9 | श्री. गंगाराम सर्जेराव चव्हाण | बाळासाहेब देसाई कॉलेज पाटण |

| राज्यस्तरीय समन्वय समिती | | |
|---|---|---|
| अ. क्रं. | नाव | कॉलेजचे नाव |
| 1 | प्राचार्य डॉ. शरयू तायवाडे | तायवाडे कॉलेज, महादुला, कोराडी |
| 2 | प्राचार्य डॉ. स. ना. भारंबे | मुळजी जेठा महाविद्यालय, जळगाव |
| 3 | प्राचार्य डॉ. अतुल साळुंखे | कोएसोचे डॉ.सी. डी. देशमुख वाणिज्य व सौ. के. जी. ताम्हाणे कला महाविद्यालय |
| 4 | प्राचार्य डॉ. नितीन घोरपडे | पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे अण्णासाहेब मगर महाविद्यालय |
| 5 | प्राचार्य डॉ.धनंजय तळवणकर | गो से विज्ञान, कला वाणिज्य महाविद्यालय, खामगांव |
| 6 | प्राचार्य डॉ.एस. बी. पाटील | दादासाहेब ज्योतीराम गोडसे आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, वडूज |
| 7 | प्राचार्य डॉ. महेंद्र रघुवंशी | जी. टी. पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नंदुरबार |
| 8 | प्राचार्य डॉ. सुजित मेत्रे | श्री बिंझाणी नगर महाविद्यालय, नागपूर |
| 9 | प्रा. डॉ. दिनेश खेडकर | शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती |
| 10 | प्रा. डॉ. नरेंद्र रघटाटे | श्री बिंझानी नगर महाविद्यालय, नागपूर |
| 11 | प्रा. डॉ. श्रीराम फरताडे | श्री बिंझाणी नगर महाविद्यालय, नागपूर |

# राज्यस्तरीय समिती

| राज्यस्तरीय सेंटर ऑफ एक्सलन्स समिती | | |
|---|---|---|
| अ. क्रं. | नाव | कॉलेजचे नाव |
| 1 | प्राचार्य डॉ. स. ना. भारंबे | मु.जे.महाविद्यालय, जळगाव |
| 2 | प्राचार्य डॉ. संजय खरात | प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे मॉडर्न कॉलेज ऑफ आर्ट सायन्स अँड कॉमर्स, गणेशखिंड |
| 3 | प्राचार्य डॉ. महेंद्र रघुवंशी | जी. टी. पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नंदुरबार |
| 4 | प्राचार्या डॉ. स्मिता सुरवसे | संत राऊळ महाराज महाविद्यालय, कुडाळ |
| 5 | प्राचार्य डॉ. शंकर लावरे | मुळा एज्युकेशन सोसायटी चे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सोनई. ता. नेवासा, जि. अहिल्यानगर |
| 6 | डॉ. दत्ता नरसाळे | आनंदराव धोंडे महाविद्यालय , कडा, बीड |
| 7 | प्रा. झोळेकर राजेंद्र भाऊसाहेब | क्रांतिवीर वसंतराव नारायणराव नाईक शिक्षण प्रसारक संस्थेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नाशिक |
| 8 | प्रा. डॉ. भागवत परकाळ | अहमदनगर महाविद्यालय, अहिल्यानगर |
| 9 | प्रा. डॉ. गोदावरी आत्माराम गौरकर | एस. चंद्रा. महिला महाविद्यालय साकोली जि. भंडारा |

| स्टेट रिसोर्स सेंटर - MPSC समिती | | |
|---|---|---|
| अ. क्रं. | नाव | कॉलेजचे नाव |
| 1 | प्राचार्य डॉ.एस. बी. पाटील | दादासाहेब ज्योतीराम गोडसे आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, वडूज |
| 2 | प्राचार्य डॉ.मोहन खताळ | देगलूर महाविद्यालय, देगलूर |
| 3 | प्रा. डॉ. बबन सिनगारे | द.ग.तटकरे महाविद्यालय माणगाव रायगड |
| 4 | प्रा. डॉ. विनोद नन्नवरे | डॉ. अण्णासाहेब जी. डी. बेंडाळे महिला महाविद्यालय जळगाव |
| 5 | प्रा श्रीकृष्ण सब्बलसिंग परिहार | संत ज्ञानेश्वर महाविद्यालय सोयगाव |
| 6 | डॉ. दयाराम दगडोबा मस्के | आदर्श महाविद्यालय, हिंगोली |
| 7 | प्रा. डॉ. उपेंद्र बागूल | महिला महाविद्यालय, नागपूर |
| 8 | प्रा. डॉ वसंत केशवराव डोंगरे | सुंदरराव मोरे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पोलादपूर |
| 9 | प्रा.मंगेश वामनराव वागदे | गोपिकाबाई भुरे महिला महाविद्यालय तुमसर जिल्हा भंडारा |

# राज्यस्तरीय समिति

| स्टेट रिसोर्स सेंटर - PSU समिती | | |
|---|---|---|
| अ. क्रं. | नाव | कॉलेजचे नाव |
| 1 | प्राचार्य डॉ. सुजित मेत्रे | श्री बिंझाणी नगर महाविद्यालय, नागपूर |
| 2 | प्राचार्य डॉ.सतीशचंद्र सुर्यवंशी | श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय,श्रीगोंदा |
| 3 | प्राचार्य डॉ. विजय भागडिया | श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय अमरावती |
| 4 | प्रा. स्नेहा जगदाळे | श्री नारायण गुरू कॉलेज ऑफ कॉमर्स |
| 5 | प्रा. डॉ. उपेंद्र बागूल | महिला महाविद्यालय, नागपूर |
| 6 | प्रा. शिवकांत पुपलवाड | डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, पेठ वडगाव |
| 7 | डॉ. शाहीन सय्यद | श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित विज्ञान महाविद्यालय नागपूर |

| स्टेट रिसोर्स सेंटर - UPSC समिती | | |
|---|---|---|
| अ. क्रं. | नाव | कॉलेजचे नाव |
| 1 | मा. प्राचार्य डॉ. अनिल अडसुळे | सेंट विन्सेंट महाविद्यालय, पुणे |
| 2 | प्राचार्य डॉ. प्रमोद काटकर | सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर |
| 3 | प्रा. डॉ.जयेंद्र लेकुरवाळे | डॉ. आण्णासाहेब जी. डी. बेंडाळे महीला महाविद्यालय, जळगाव |
| 4 | प्रा. डॉ. दिनेश खेडकर | शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती |
| 5 | प्रा. डॉ. वैशाली पेरके | एकता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित कला महाविद्यालय, बिडकीन |
| 6 | प्रा. डॉ. संभाजी पाटील | श्री शि.वि. प्र. संस्थेचे भाऊसाहेब ना.स. साहित्य आणि मु. फि. मु. अ. वाणिज्य महाविद्यालय, धुळे |
| 7 | प्रा. डॉ.भाऊसाहेब गायकवाड | गुलाम नबी आझाद कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, बार्शीटाकळी जि.अकोला |

| स्टेट रिसोर्स सेंटर - शासकीय प्रस्ताव आणि परदेशी स्कॉलरशिप यासाठीची समिती | | |
|---|---|---|
| अ. क्रं. | नाव | कॉलेजचे नाव |
| 1 | प्राचार्य डॉ. अतुल साळुंखे | कोएसोचे डॉ.सी. डी. देशमुख वाणिज्य व सौ. के. जी. ताम्हाणे कला महाविद्यालय |
| 2 | प्राचार्य डॉ. सुजित मेत्रे | श्री बिंझाणी नगर महाविद्यालय, नागपूर |
| 3 | प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर | महात्मा फुले आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, पनवेल |
| 4 | प्राचार्य डॉ. दिलीप भारमल | एस .पी. के. कॉलेज, सावंतवाडी |
| 5 | प्राचार्य डॉ.भारत दत्तराव खंदारे | लालबहादूर शास्त्री वरिष्ठ महाविद्यालय, परतुर |
| 6 | प्राचार्य डॉ. प्रदीप टेकाडे | बजाज कॉलेज ऑफ सायन्स, वर्धा |
| 7 | प्रा. डॉ. शिवाजी उकरंडे | गोगटे- जोगळेकर कॉलेज, रत्नागिरी |
| 8 | प्रा. हेमंत किशनराव सुर्यवंशी | कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय किन्हवली ता.शहापूर जि. ठाणे |
| 9 | प्रा. डॉ. इर्शाद शेख | एम बी हॅरीस कॉलेज ऑफ आर्ट्स काळसेकर कॉलेज ऑफ कॉमर्स अँड मॅनेजमेंट नालासोपारा वेस्ट |

| स्टेट रिसोर्स सेंटर - उद्योजकता विकास समिती | | |
|---|---|---|
| अ. क्रं. | नाव | कॉलेजचे नाव |
| 1 | प्राचार्य डॉ. श्रीकुमार महामुनी | शारदाबाई पवार महिला आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, शारदानगर, बारामती |
| 2 | प्राचार्य डॉ. संजय माधव सानप | के. व्ही. एन. नाईक शिक्षण प्रसारक संस्थेचे आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज |
| 3 | प्राचार्य डॉ. संजय अस्वले | श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय उमरगा, धाराशीव |
| 4 | प्रा. डॉ. राजकुमार सुरवसे | शारदाबाई पवार महिला आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, शारदानगर, बारामती |
| 5 | प्रा. डॉ. रंजना जीवने | श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालय, पुसद |
| 6 | प्रा. डॉ. ज्योती जोशी | प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे मॉडर्न कॉलेज ऑफ आर्ट सायन्स अँड कॉमर्स, गणेशखिंड |
| 7 | प्रा.अक्षता हरिश्चंद्र मोंडकर | पुंडलिक अंबाजी कर्ले कला व वाणिज्य महाविद्यालय शिरगाव |
| 8 | प्रा. डॉ. संतोष भिमराज औताडे | श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था शिर्डी संचलीत, श्री साईबाबा महाविद्यालय शिर्डी |
| 9 | प्रा.प्रद्युम्न मुलचंद बोरा | एसएनजेबी स्व. सौ कांताबाई भवरलालजी जैन कॉलेज ऑफ इंजिनीरिंग चांदवड |

| स्टेट रिसोर्स सेंटर - रेल्वे पोस्ट आणि इतर आस्थापना समिती | | |
|---|---|---|
| अ. क्रं. | नाव | कॉलेजचे नाव |
| 1 | प्राचार्य डॉ. शरयू तायवाडे | तायवाडे कॉलेज, महादुला, कोराडी |
| 2 | प्राचार्य डॉ. विजय भागडिया | श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय अमरावती |
| 3 | प्राचार्य डॉ. माधव बापट | डी. बी. जे. महाविद्यालय, चिपळूण |
| 4 | प्रा. डॉ. हनुमंतराव जगताप | कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालय, उरण, रायगड |
| 5 | प्रा. डॉ. संजय पाटील | पंकज आर्ट्स सायन्स अँड कॉमर्स कॉलेज चोपडा जळगाव |
| 6 | प्रा. डॉ. पंकज चौधरी | विठ्ठल रुक्मिणी महाविद्यालय, सवना |
| 7 | डॉ गोकुळ पुजू बोरसे | राणी लक्ष्मीबाई महाविद्यालय, पारोळा |

# राज्यस्तरीय समिती

| स्टेट रिसोर्स सेंटर - बँकिंग समिती | | |
|---|---|---|
| अ. क्रं. | नाव | कॉलेजचे नाव |
| 1 | प्राचार्य डॉ. नितीन घोरपडे | पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे अण्णासाहेब मगर महाविद्यालय |
| 2 | प्राचार्य डॉ. विजय भागडिया | श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय अमरावती |
| 3 | प्रा. डॉ. सुनील ओगले | विद्या प्रतिष्ठानचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, विद्यानगरी बारामती |
| 4 | डॉ. लक्ष्मीनारायण कुरपटवार | पंडित जवाहरलाल नेहरू महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर |
| 5 | प्रा. डॉ. योगिता चौधरी | आप्पासाहेब रघुनाथराव गरूड कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय शेंदुर्णी ता जामनेर जि जळगाव |
| 6 | डॉ. डी. आर. पाणझाडे | यशवंतराव चव्हाण महाविद्यालय सिल्लोड |
| 7 | प्रा. प्रशांत श्रावण गायकवाड | राजीव विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय झरी जामणी |
| 8 | डॉ. मनोज लिंबराज सोमवंशी | शंकरराव जावळे पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, लोहारा |
| 9 | प्रा.डॉ.उमाटे साईनाथ तुकाराम | दयानंद वाणिज्य महाविद्यालय लातूर |

| स्टेट रिसोर्स सेंटर - कॉर्पोरेट प्लेसमेंट व ओव्हरसीज प्लेसमेंट समिती | | |
|---|---|---|
| अ. क्रं. | नाव | कॉलेजचे नाव |
| 1 | प्राचार्य डॉ. प्रज्ञा प्रभू | क.जे. सोमैया कॉलेज ऑफ सायन्स अँड कॉमर्स |
| 2 | प्राचार्य डॉ. स. ना. भारंबे | मुळजी जेठा महाविद्यालय, जळगाव |
| 3 | प्रा. डॉ. सुनिल भादुले | डी. बी. जे. महाविद्यालय, चिपळूण |
| 4 | प्रा. स्नेहा जगदाळे | श्री नारायण गुरू कॉलेज ऑफ कॉमर्स |
| 5 | प्रा. विलास सुद्रिक | श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय,श्रीगोंदा |
| 6 | प्रा. नवनाथ नागरे | सहकारमहर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, संगमनेर |
| 7 | डॉ. अश्विनी दानव (बोधाने) | श्री मथुरादास मोहोता विज्ञान महाविद्यालय, नागपूर |
| 8 | प्रा. डॉ. सद्दाम सय्यद | एम बी पटेल आर्ट्स कॉमर्स सायन्स कॉलेज |

# स्टेट रिसोर्स सेंटर

आजच्या स्पर्धात्मक युगात सरकारी सेवा, प्रशासकीय पदे, सुरक्षा दल, वित्तीय संस्था, आणि इतर अनेक क्षेत्रांमध्ये रोजगार मिळवण्यासाठी उमेदवारांना विविध प्रकारच्या स्पर्धा परीक्षा द्याव्या लागतात. UPSC, MPSC, SSC, रेल्वे, बँकिंग, पोलीस भरती, वनसेवा, तलाठी, लिपिक–टंकलेखक, इ. परीक्षांमधून लाखो विद्यार्थी आपले भविष्य घडवण्यासाठी प्रयत्न करत असतात. या स्पर्धा परीक्षांची स्वरूपे, पातळी, आणि आवश्यक तयारी ही अत्यंत व्यापक व सखोल असते. त्यामुळे अशा प्रकारच्या परीक्षांसाठी दर्जेदार मार्गदर्शन, नियोजनबद्ध अभ्यास आणि आत्मविश्वास वाढवणारे वातावरण आवश्यक असते.

राज्यातील एका विषयातील सर्व प्रकारच्या तज्ज्ञ व्यक्तींचे एकत्रीकरण करून त्यांच्या ज्ञानाचा व संशोधनाचा उपयोग ऑनलाईन पद्धतीने राज्यभरातील महाविद्यालयामध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या करिअरसाठी व्हावा या उद्देशाने करिअर कट्टा अंतर्गत वेगवेगळ्या विषयाला अनुसरून स्टेट रिसोर्स सेंटरची स्थापना केली जात आहे. यामध्ये ज्या महाविद्यालयाचा समावेश स्टेटस सेंटरमध्ये केला जाईल अशा ठिकाणी एक अद्ययावत रेकॉर्डिंग स्टुडिओ उपलब्ध असेल. संबंधित विषयातील तज्ज्ञ मार्गदर्शक या महाविद्यालयांमध्ये येतील आणि त्या ठिकाणाहून राज्यातील सर्व विद्यार्थ्यांची संवाद साधतील त्यांना मार्गदर्शन करतील. त्या विषयासाठी चे सराव प्रश्न तयार करणे मुलाखतीची तयारी करून घेणे एखाद्या विशिष्ट क्षेत्रांमध्ये मनुष्यबळाची भरती होणार असेल तर त्याची माहिती मुलांना उपलब्ध करून देणे आणि त्या परीक्षेसाठी तयारी करून घेणे हा उद्देश स्टेट रिसोर्स सेंटरच्या स्थापनेमागे आहे.

- माहितीच्या सोयीसाठी: विद्यार्थ्यांना विविध स्पर्धात्मक परीक्षा आणि सरकारी नोकऱ्यांसाठी अद्ययावत माहिती उपलब्ध होईल.
- मार्गदर्शनाचा अभाव कमी करणे: ग्रामीण आणि दुर्गम भागातील विद्यार्थ्यांसाठी सुलभ मार्गदर्शन पुरवणे.
- स्पर्धात्मक वातावरण निर्माण करणे: सर्व विद्यार्थ्यांना समान संधी देणे, विशेषतः कमी संसाधन असलेल्या विद्यार्थ्यांना.
- व्यावसायिक कौशल्यांची तयारी: विद्यार्थ्यांना केवळ परीक्षा उत्तीर्ण होण्याची नाही, तर मुलाखती आणि करिअरसाठी आवश्यक कौशल्येही शिकवणे.
- अर्थसहाय्याची उपलब्धता: शिष्यवृत्त्या, शासकीय योजना आणि अनुदानांच्या माहितीचे वितरण.
- प्रेरणा आणि आत्मविश्वास निर्माण करणे: विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढवणारे कार्यशाळा व मार्गदर्शन.
- स्थानिक क्षेत्रात रोजगाराची संधी वाढवणे: विद्यार्थ्यांना जागतिक आणि स्थानिक बाजारपेठेत तयार करणे.
- समाजातील विविधता आणि समावेशिता वाढवणे: सर्व वर्ग, जात, आणि स्थानिक पातळीवर समान संधी उपलब्ध करणे.
- कॅम्पस इंटरव्ह्यू व प्लेसमेंट प्रक्रिया: विद्यार्थ्यांना कंपन्यांमध्ये आणि सरकारी संस्थांमध्ये स्थानिक कॅम्पस इंटरव्ह्यूसाठी तयार करणे.

**मार्गदर्शन केंद्रांच्या उपक्रमासाठी "Career Katta" या व्यासपीठाने स्टेट रिसोर्स सेंटर च्या माध्यमातून पुढाकार घेतला आहे. या उपक्रमांतर्गत खालील महाविद्यालयांची निवड संबंधित विषयानुसार करण्यात आली आहे:**

१. UPSC – सेंट व्हिन्सेंट महाविद्यालय, स्वारगेट, पुणे

२. MPSC – जी. डी. भेंडाळे महाविद्यालय, जळगाव

३. PSU – सिटी बिनजानी महाविद्यालय, नागपूर

४. कॉर्पोरेट प्लेसमेंट – मु. जे. महाविद्यालय, जळगाव

५. बँकिंग – विद्या प्रतिष्ठान, बारामती

६. स्पर्धा परीक्षा मुलाखती – सेंट व्हिन्सेंट महाविद्यालय, पुणे आणि जी. डी. भेंडाळे महाविद्यालय

७. उद्योजकता विकास – शारदाबाई पवार महाविद्यालय, बारामती

८. ओव्हरसीज प्लेसमेंट – सोमय्या महाविद्यालय

९. शासकीय प्रस्ताव व विद्यार्थ्यांसाठी स्कॉलरशिप – करिअर कट्टाच्या वतीने राज्यस्तरीय समिती

१०. रेल्वे, पोस्ट व इतर केंद्र शासनाच्या आस्थापनांवरील भरती प्रक्रिया – डॉ. आंबेडकर महाविद्यालय, दीक्षाभूमी, नागपूर

## १. UPSC प्रक्रियेसाठी स्टेट रिसोर्स सेंटर – एक प्रेरणादायी पाऊल

भारतीय प्रशासकीय सेवेतील (UPSC) अधिकारी घडवण्यासाठी राज्यातील विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन, अभ्याससाहित्य, व प्रेरणादायी वातावरण देण्याच्या उद्देशाने स्टेट रिसोर्स सेंटरची संकल्पना राबवण्यात येत आहे. ही केंद्रे विशेषतः ग्रामीण व निमशहरी भागातील विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ठरणार आहेत, जेथे गुणवत्तापूर्ण मार्गदर्शनाची कमतरता आहे. या केंद्रांमधून विद्यार्थ्यांना UPSC परीक्षेच्या पूर्व, मुख्य व मुलाखत या तिन्ही टप्प्यांसाठी अभ्यासक्रमाचे नियोजनबद्ध प्रशिक्षण दिले जाते. अभ्यासासाठी अद्ययावत संदर्भ साहित्य, ऑनलाईन–ऑफलाईन लेक्चर्स, अनुभवसंपन्न मार्गदर्शकांचे सेशन्स, तसेच व्यक्तिमत्त्व विकासावर भर दिला जातो. UPSC ही केवळ परीक्षा नसून, ही एक व्यापक मानसिक, बौद्धिक आणि नैतिक तयारी आहे. स्टेट रिसोर्स सेंटर ही तयारी समतोल, व्यावसायिक आणि प्रेरक पद्धतीने घडवण्यासाठी एक प्रभावी व्यासपीठ ठरते. यातून महाराष्ट्रातील हुशार, पण संसाधनांपासून वंचित असलेल्या विद्यार्थ्यांना संधी मिळणार असून, सामाजिक समता आणि गुणवत्तापूर्ण प्रशासकीय सेवा याकडे हे पाऊल एक महत्त्वाचा टप्पा ठरेल.

## २. MPSC प्रक्रियेसाठी स्टेट रिसोर्स सेंटर – ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी आशेचा किरण

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (MPSC) परीक्षांमध्ये यश मिळवण्यासाठी केवळ कठोर अभ्यास पुरेसा नसतो, तर योग्य दिशा, योग्य मार्गदर्शन आणि सुसंगत अभ्याससामग्रीचीही आवश्यकता असते. याच गरजांची पूर्तता करण्यासाठी 'स्टेट रिसोर्स सेंटर' ही संकल्पना राबवण्यात आली आहे. या केंद्रांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना MPSC पूर्व परीक्षा, मुख्य परीक्षा व मुलाखतीसाठी सर्वांगीण तयारीचे प्रशिक्षण दिले जाते. अभ्यासासाठी आवश्यक संदर्भ पुस्तके, चालू घडामोडींचा सखोल अभ्यास, वस्तुनिष्ठ आणि वर्णनात्मक उत्तरलेखन कौशल्य, तसेच तज्ञ मार्गदर्शकांचे व्याख्यान यांचा समावेश असतो. हे केंद्र खास करून ग्रामीण, आदिवासी व आर्थिकदृष्ट्या दुर्बल पार्श्वभूमीतील विद्यार्थ्यांसाठी एक परिवर्तनाची संधी आहे. इथे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढवणाऱ्या चर्चा, सराव चाचण्या आणि मुलाखतीसाठी प्रत्यक्ष सराव यावर भर दिला जातो. MPSC परीक्षा म्हणजे फक्त नोकरी मिळवण्याचा मार्ग नाही, तर समाजपरिवर्तनाचा एक प्रभावी माध्यम आहे. स्टेट रिसोर्स सेंटर ही स्वप्नांची पायाभरणी करणारी आणि महाराष्ट्राच्या प्रशासकीय व्यवस्थेत समावेशिता वाढवणारी अभिनव संकल्पना ठरत आहे.

## ३. पी एस यु भरती प्रक्रियेसाठी स्टेट रिसोर्स सेंटर – तांत्रिक ज्ञानातून स्थिर भविष्याकडे

सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम (Public Sector Undertakings - PSUs) जसे की ONGC, BHEL, NTPC, GAIL, HPCL, SAIL, ISRO, DRDO इत्यादी देशाच्या औद्योगिक विकासात मोलाची भूमिका बजावतात. या आस्थापनांमध्ये

मिळणाऱ्या नोकऱ्या केवळ प्रतिष्ठेच्या नाहीत, तर त्या स्थैर्य, उत्कृष्ट वेतन व सामाजिक सुरक्षा देणाऱ्या असतात. परंतु या परीक्षांसाठी योग्य माहिती, अभ्यासपद्धती आणि मार्गदर्शन यांचा अभाव दिसून येतो. याची माहिती वेळेवर योग्य वयात महाराष्ट्रातील तरुणांच्या पर्यंत पोहोचत नसल्यामुळे या परीक्षेमध्ये सहभागी होणाऱ्या तरुणांची संख्या कमी आहे ही संधी महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना उपलब्ध व्हावी या उद्देशाने देशातील सर्व पी एस सी मध्ये निघाणाऱ्या भरतीच्या जाहिराती एकत्र करणे त्याची वेळोवेळी माहिती राज्यातील विद्यार्थ्यांना देणे पी एस सी च्या भरती प्रक्रियेला आवश्यक असणारी लेखी व मुलाखतीची तयारी करून घेण्यासाठी अभ्यासक्रम बनवणे त्याचे प्रशिक्षण घेणे आणि सराव परीक्षेच्या माध्यमातून मुलांना मदत करणे हा या स्टेटस सेंटर पाठीमागील उद्देश आहे.

### ४. कॉर्पोरेट प्लेसमेंटसाठी स्टेट रिसोर्स सेंटर – रोजगारक्षमतेकडून करिअरकडे

कॉर्पोरेट जगतात यशस्वी करिअर घडवण्यासाठी केवळ पदवी पुरेशी नसते; त्यासाठी आवश्यक असते उद्योगक्षेत्राची समज, व्यावसायिक कौशल्ये आणि प्रभावी संवादकौशल्य. हीच गरज लक्षात घेऊन 'स्टेट रिसोर्स सेंटर – कॉर्पोरेट प्लेसमेंट' हे केंद्र उभारण्यात आले आहे. या केंद्रामध्ये विद्यार्थ्यांना उत लेखन, ग्रुप डिस्कशन, मॉक इंटरव्ह्यू, प्रेझेंटेशन स्किल्स, कॉर्पोरेट एथिक्स, आणि इंडस्ट्री इनसाइट्स यासारख्या क्षेत्रांमध्ये प्रशिक्षण दिले जाते. स्थानिक व राष्ट्रीय कंपन्यांचे अधिकारी, HR तज्ज्ञ, तसेच उद्योजक विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांना उद्योगाच्या प्रत्यक्ष गरजांशी जोडतात. या केंद्राचा उद्देश आहे – विद्यार्थ्यांच्या अंतर्गत क्षमता ओळखून त्यांना रोजगारासाठी नव्हे, तर दीर्घकालीन करिअरसाठी सज्ज करणे. ग्रामीण व निमशहरी भागातील विद्यार्थ्यांसाठी ही एक सुवर्णसंधी आहे, जी त्यांना शहरातील विद्यार्थ्यांप्रमाणेच स्पर्धात्मक वातावरण व साधनसंपत्ती उपलब्ध करून देते. हे केंद्र म्हणजे विद्यार्थ्यांच्या ज्ञानातून आत्मविश्वासाकडे आणि आत्मविश्वासातून संधींच्या जगाकडे जाणारा पूल ठरतो.

### ५. बँकिंग क्षेत्रासाठी स्टेट रिसोर्स सेंटर – सुरक्षित करिअरकडे आत्मविश्वासाने वाटचाल

बँकिंग क्षेत्र हे आजच्या तरुणाईसाठी सर्वाधिक स्थैर्यपूर्ण आणि प्रतिष्ठेचे करिअर विकल्प मानले जाते. IBPS, RBI, SBI यांसारख्या परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी योग्य मार्गदर्शन आणि तयारीसाठी 'स्टेट रिसोर्स सेंटर – बँकिंग' ही संकल्पना राबवण्यात आली आहे. या केंद्रात विद्यार्थ्यांना संख्यात्मक अभियोग (Quantitative Aptitude), तार्किक विचारशक्ती (Logical Reasoning), सामान्य ज्ञान व चालू घडामोडी, इंग्रजी भाषा कौशल्य, तसेच बँकिंग व वित्तीय प्रणालीची मूलभूत माहिती यावर अभ्यासक्रम आधारित प्रशिक्षण दिले जाते. नियमित सराव चाचण्या (Mock Tests), वेळेचे नियोजन, आणि निकालानंतरच्या मुलाखतींची तयारी हे या केंद्राचे विशेष वैशिष्ट्य आहे. या प्रशिक्षणातून केवळ परीक्षा उत्तीर्ण होण्याची तयारीच नव्हे, तर एका शिस्तबद्ध, उत्तरदायित्व असलेल्या बँक कर्मचाऱ्याची मानसिकताही विकसित केली जाते.

### ६. स्पर्धा परीक्षा मुलाखतीसाठी स्टेट रिसोर्स सेंटर – आत्मविश्वासातून यशाकडे

स्पर्धा परीक्षा म्हणजे फक्त पुस्तकातील ज्ञान नव्हे, तर त्या ज्ञानाला योग्यरितीने व्यक्त करण्याची किमया. अनेक विद्यार्थी लेखी परीक्षा उत्तीर्ण होतात, पण मुलाखतीच्या टप्प्यावर त्यांना योग्य मार्गदर्शनाचा अभाव जाणवतो. हीच पोकळी भरून काढण्यासाठी 'स्टेट रिसोर्स सेंटर – स्पर्धा परीक्षा मुलाखत प्रशिक्षण' ही संकल्पना पुढे आली आहे. या केंद्रात विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्व विकास, शारीरिक सादरीकरण, शांत आणि प्रभावी संवाद कौशल्य, प्रश्नोत्तर सत्रांची तयारी, बॉडी लँग्वेज, आणि समसामयिक घडामोडींची मांडणी अशा विविध घटकांवर मार्गदर्शन दिले जाते. अनुभवी अधिकारी, प्रशासकीय सेवांमधील तज्ज्ञ

आणि यशस्वी उमेदवारांमार्फत मॉक इंटरव्ह्यू घेतले जातात, जे परीक्षार्थींना वास्तविक अनुभवाची तयारी करून देतात. हे केंद्र मुलाखतीकडे भीतीने न पाहता, ती ही एक संवादाची संधी आहे असा आत्मविश्वास विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करते. केवळ ज्ञान असून चालत नाही, ते योग्य शब्दांत, योग्य भावनेत आणि योग्य ठिकाणी सादर करणे हेच यशाचे गमक आहे – आणि हेच या केंद्रात शिकवले जाते.

## ७. उद्योजकता विकासासाठी स्टेट रिसोर्स सेंटर – नोकरी मागणाऱ्यांऐवजी नोकरी देणारे घडवण्यासाठी

आजच्या तरुणाईसमोर फक्त नोकरी मिळवण्याचाच नाही, तर स्वतःचा व्यवसाय उभा करण्याचाही मार्ग खुला आहे. ही उद्योजकता रुजावी, वाढावी आणि यशस्वी व्हावी यासाठी 'स्टेट रिसोर्स सेंटर – उद्योजकता विकास' ही अभिनव संकल्पना राबवण्यात आली आहे. या केंद्रात विद्यार्थ्यांना व्यवसाय कल्पना ओळखणे, बिझनेस मॉडेल तयार करणे, फायनान्स व मार्केटिंग मूलतत्त्वे, सरकारी योजना व अनुदाने, स्टार्टअप पिचिंग स्किल्स, आणि नेटवर्किंग यासारख्या मूलभूत गोष्टी शिकवल्या जातात. यासोबतच यशस्वी उद्योजकांचे अनुभव, कार्यशाळा, तसेच उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञांशी थेट संवाद यातून विद्यार्थ्यांमध्ये स्वयंपूर्णतेची भावना रुजवली जाते. हे केंद्र म्हणजे स्वप्न बघणाऱ्या आणि ती प्रत्यक्षात उतरवू इच्छिणाऱ्या तरुणांसाठी एक उड्डाणपथ आहे. ग्रामीण, शहरी व निमशहरी भागातील युवकांना स्थानिक संसाधनांचा वापर करून स्वतःचे उद्योग उभारण्यास प्रेरणा आणि साधनसंपत्ती दोन्ही येथे दिली जातात. 'उद्योजक घडवा, रोजगार निर्माण करा' ही या केंद्रामागची खरी प्रेरणा आहे.

## ८. ओव्हरसीज प्लेसमेंटसाठी स्टेट रिसोर्स सेंटर – जागतिक करिअरसाठी भक्कम पायाभरणी

आंतरराष्ट्रीय स्तरावर शिक्षण, नोकरी किंवा इंटर्नशिपसाठी संधी शोधणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आवश्यक असते स्पष्ट माहिती, योग्य मार्गदर्शन आणि स्पर्धात्मक तयारी. ही गरज ओळखून 'स्टेट रिसोर्स सेंटर – ओव्हरसीज प्लेसमेंट' ही संकल्पना राबवण्यात आली आहे. या केंद्रामार्फत विद्यार्थ्यांना विदेशी विद्यापीठांचे अभ्यासक्रम व प्रवेशप्रक्रिया, **IELTS, TOEFL, GRE, GMAT** यांसारख्या परीक्षांची तयारी, विदेशी नोकरीसाठी **CV** आणि **SOP** लेखन, स्कॉलरशिप्स व अनुदानांची माहिती, तसेच कौशल्यावर आधारित नोकऱ्यांची तयारी यावर मार्गदर्शन दिले जाते. शिवाय, व्हिसा प्रक्रियेपासून ते सांस्कृतिक जुळवून घेण्यापर्यंत संपूर्ण सल्ला व सहकार्य पुरवले जाते. हे केंद्र केवळ परदेशी संधी शोधणाऱ्या विद्यार्थ्यांना मदत करत नाही, तर त्यांना एका जागतिक व्यासपीठावर आत्मविश्वासाने उभं राहण्यासाठी आवश्यक त्या सर्व कौशल्यांची आणि माहितीची व्यवस्था करतं. 'जागतिक विचार, स्थानिक पाया' ही या केंद्राची खरी ओळख आहे.

## ९. शासकीय प्रस्ताव व विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती – समावेशक शिक्षणासाठी राज्यस्तरीय प्रयत्न

आज शिक्षणाची गुणवत्ता आणि उपलब्धता वाढली असली, तरी अनेक विद्यार्थी आर्थिक अडचणींमुळे त्यांच्या क्षमतेनुसार शिकू शकत नाहीत. यासाठी शासनामार्फत विविध शिष्यवृत्ती योजना, शैक्षणिक अनुदाने, तसेच शासकीय प्रस्तावांद्वारे विशेष प्रकल्प राबवले जातात. या सर्व संधींपर्यंत विद्यार्थ्यांना पोहोचवण्यासाठी 'स्टेट रिसोर्स सेंटर – शासकीय प्रस्ताव व शिष्यवृत्ती मार्गदर्शन' ही अभिनव रचना केली गेली आहे. या केंद्राच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना राज्य व केंद्र शासनाच्या विविध शिष्यवृत्ती योजनांची माहिती, ऑनलाईन अर्ज प्रक्रियेचे मार्गदर्शन, अर्ज भरताना होणाऱ्या चुका टाळण्यासाठी सहाय्य, तसेच संशोधनासाठी शासकीय प्रकल्प कसे लिहावेत व सादर करावेत, यावर तांत्रिक प्रशिक्षण दिले जाते. या उपक्रमामुळे आर्थिक

दुर्बल व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही समान संधी प्राप्त होतात, व त्यांना शिक्षणात, संशोधनात आणि स्पर्धा परीक्षांमध्ये पूर्ण क्षमतेने सहभागी होता येते. हे केंद्र म्हणजे स्वप्नं पाहणाऱ्यांसाठी मार्गदर्शक दीपस्तंभ, आणि 'कोणताही विद्यार्थी केवळ पैशाअभावी मागे राहू नये' या विचाराची प्रत्यक्ष अंमलबजावणी.

## १०. रेल्वे, पोस्ट व इतर केंद्र शासनाच्या आस्थापनांवरील भरती प्रक्रिया – निर्धारातून सरकारी सेवेकडे वाटचाल

भारतीय रेल्वे, भारतीय पोस्ट, SSC, कर्मचारी निवड आयोग (Staff Selection Commission), मंत्रालयीन विभाग, संरक्षण व निमलष्करी सेवा, आणि इतर अनेक केंद्र सरकारच्या आस्थापनांमध्ये दरवर्षी मोठ्या प्रमाणावर भरती प्रक्रिया राबवली जाते. या परीक्षांसाठी ग्रामीण व निमशहरी भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार मार्गदर्शन, योग्य अभ्यासक्रम व नियोजनबद्ध तयारीची गरज असते. हाच उद्देश लक्षात घेऊन स्थापन करण्यात आले आहे – 'स्टेट रिसोर्स सेंटर – केंद्र शासनाच्या भरती प्रक्रियेसाठी'. या केंद्रात रेल्वे, पोस्ट, SSC, LIC, EPFO, FCI, DRDO, ISRO, इत्यादी भरती प्रक्रियांची माहिती, त्यांचे पात्रता निकष, परीक्षा पद्धती, विषयानुसार सखोल मार्गदर्शन, ऑनलाइन अर्ज प्रक्रिया, तसेच सराव चाचण्या व मुलाखतीसाठी तयारी यावर लक्ष केंद्रित केले जाते. विद्यार्थ्यांना वेळेचे नियोजन, जलद व अचूक उत्तरलेखन , आणि दबावाखाली काम करण्याची तयारी या महत्त्वाच्या गोष्टी शिकवल्या जातात. यामुळे त्यांना विविध पदांसाठी विश्वासाने आणि तयारीने अर्ज करता येतो. हे केंद्र म्हणजे सरकारी नोकरीची स्वप्ने बाळगणाऱ्या तरुणांसाठी मार्गदर्शन, साधने व प्रेरणा यांचे संपूर्ण केंद्र ठरते.

करिअर कट्टा चा पुढाकार व उल्लेखित महाविद्यालये ही या दिशेने महत्त्वाची पावले आहेत. यामार्फत अधिकाधिक विद्यार्थ्यांना संधी मिळेल व प्रशासनात गुणवत्ताधारित व विविधतेने परिपूर्ण सहभाग सुनिश्चित होईल.

शहर–गाव, गरीब–श्रीमंत, स्त्री–पुरुष, आणि विविध जाती–जमातीतील विद्यार्थ्यांना एकत्र घेऊन त्यांना परीक्षेत यशस्वी करण्याची ही केंद्रे म्हणजे आधुनिक भारताच्या सर्वसमावेशक शिक्षण व्यवस्थेचा पाया आहेत.

शेवटी एवढेच म्हणता येईल की, जर स्पर्धा परीक्षा ही यशाकडे नेणारी वाट असेल, तर स्टेट रिसोर्स सेंटर ही त्या वाटेवरचे दीपस्तंभ आहेत – जी अंधारातील प्रवासातही विद्यार्थ्यांना दिशा दाखवणार.

# करिअर कट्टा फलकाचा नमुना व कार्यकृती आराखडा




## कार्यकृती आराखडा

महाविद्यालयाचे ऑन बोर्डिंग करून घेणे

महाविद्यालयामध्ये करिअर कट्टा फलकाचे अनावरण करून घेणे.

महाविद्यालयाच्या माहिती पुस्तकांमध्ये करिअर कट्या विषयी माहितीचा समावेश करून, विद्यार्थ्याच्या प्रवेशाच्या वेळीच करिअर कट्ट्याचे नोंदणी शुल्क भरून घेण्याची व्यवस्था करणे.

करिअर कट्याच्या यादीमधील ॲड ऑन कोर्स महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी निवडून त्याची यादी घोषित करणे.

पहिल्या वर्षाच्या इंडक्शन प्रोग्रामच्या वेळी विद्यार्थ्यांच्या मोबाईल मध्ये करिअर कट्टा ॲप डाऊनलोड करावयास सांगणे व करिअर कट्याविषयी संपूर्ण माहिती विद्यार्थ्यांना देणे.

नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या सत्रात, विद्यार्थ्यांसाठी दिल्या जाणाऱ्या ३० तासांच्या करिअरच्यासंधी या कार्सेसची माहिती विद्यार्थ्यांना देवून सर्व विद्यार्थी यामध्ये सहभागी होतील यासाठी प्रयत्न करणे

महाविद्यालयीन समन्वयकांच्या नियमित बैठकीला उपस्थित राहणे

For Career Katta App.

For Career Katta You Tube




**MAHARASHTRA INFORMATION TECHNOLOGY SUPPORT CENTER**

Web. : www.mitsc.co.in | Email : careerkatta365@gmail.com,

Contact : 7507652555